# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – २३

## सभावृत्तांत

दिनांक – २०.११.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे नोव्हेंबर २०१३ ची मा.महापालिका सभा बुधवार दि.२०.११.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
2. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
3. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
4. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
5. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
6. मा.भालेकर अरुणा दिलीप
7. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
8. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
9. मा.थोरात वनिता एकनाथ
10. मा.सायकर अजय शंकरराव
11. मा.जाधव साधना रामदास
12. मा.जाधव राहुल गुलाब
13. मा.आल्हाट मंदा उत्तम
14. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
15. मा.काळजे नितीन प्रताप
16. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
17. मा.जगदीश शेटटी
18. मा.बाबर शारदा प्रकाश
19. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
20. मा.उल्हास शेट्टी

21. मा.पवार संगीता शाम
22. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
23. मा.तानाजी विठ्ठल खाडे
24. मा.बो-हाडे शुभांगी संजय
25. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
26. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
27. मा.भारती फरांदे
28. मा.आर.एस.कुमार
29. मा.जावेद रमजान शेख
30. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
31. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
32. मा.पांढरकर निलेश शंकरराव
33. मा.नंदा विकास ताकवणे
34. मा.नेटके सुमन राजेंद्र
35. मा.तरस बाळासाहेब जयवंत
36. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
37. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
38. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
39. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
40. मा.लोंढे गणेश नारायण
41. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
42. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
43. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
44. मा.अपर्णा निलेश डोके
45. मा.अनंत सुभाष को-हाळे
46. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
47. मा.जयश्री वसंत गावडे
48. मा.प्रसाद शेट्टी
49. मा.अविनाश (दादा) टेकावडे
50. मा.काळभोर वैशाली जालिंदर

51. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
52. मा.शेख अस्लम शैकत
53. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
54. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
55. मा.वाबळे संजय मल्हारराव
56. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
57. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
58. मा.सुपे आशा रविंद्र
59. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
60. मा.अजित दामोदर गव्हाणे
61. मा.गोफणे अनुराधा देविदास
62. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
63. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
64. मा.महेशदादा किसन लांडगे
65. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
66. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
67. मा.लोंढे शुभांगी संतोष
68. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
69. मा.ननवरे जितेंद्र बाबा
70. मा.सावळे सिमा रविंद्र
71. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
72. मा.भोसले राहूल हनुमंतराव
73. मा.पालांडे सुजाता सुनिल
74. मा.बहल योगेश मंगलसेन
75. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
76. मा.कदम सदगुरु महादेव
77. मा.गिता सुशिल मंचरकर
78. मा.कैलास महादेव कदम
79. मा.छाया जगन्नाथ साबळे
80. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

81. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
82. मा.आसवाणी सविता धनराज
83. मा.वाघेरे सुनिता राजेश
84. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
85. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
86. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
87. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
88. मा.काळे विमल रमेश
89. मा.पाडाळे निता विलास
90. मा.विनोद जयवंत नढे
91. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
92. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
93. मा.विमलताई सुरेश जगताप
94. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
95. मा.बारणे निलेश हिरामण
96. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
97. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
98. मा.बारणे माया संतोष
99. मा.ओव्हाळ शेखर अशोक
100. मा.यमुनाताई रमणनाना पवार
101. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
102. मा.कलाटे स्वाती मयुर
103. मा.नांदगुडे विलास एकनाथ
104. मा.चौंधे आरती सुरेश
105. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
106. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
107. मा.बोकड रामदास गेणभाऊ
108. मा.जवळकर वैशाली राहुल
109. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
110. मा.जगताप राजेंद्र गणपत

**111.** मा.शितोळे शैलजा बाबुराव
**112.** मा.जगताप नवनाथ दत्तु
**113.** मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
**114.** मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
**115.** मा.जम सोनाली पोपट
**116.** मा.प्रशांत शितोळे
**117.** मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
**118.** मा.काटे रोहितअप्पा सुदाम
**119.** मा.गायकवाड संध्या सुरदास
**120.** मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
**121.** मा.शेंडगे आशा सुखदेव
**122.** मा.मोटे किरण बाळासाहेब
**123.** मा.संजय केशव काटे
**124.** मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
**125.** मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
**126.** मा.पाटील सुजित वसंत
**127.** मा.बो-हाडे अरुण तुकाराम
**128.** मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी – आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.गायकवाड, मा.डॉ.माने, मा.टेकाळे, मा.खांडकेकर - सहा.आयुक्त, मा.गावडे - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण- सहशहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय - प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.डॉ.पवन साळवे- अति.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पाटील, मा.साळवी, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.तांबे, मा.सय्यद, मा.दांगट, मा.बरशेटटी - कार्य. अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार, मा.गावडे-अग्निशामक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर**:- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

मा.महापालिका सभा क्र.२१ दि.२०.०९.२०१३ (दु.२.०० वा. व २.२० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.विनोद नढे** - मा.महापौर साहेब, भारताचे जेष्ठ शास्त्रज्ञ सीएनआर राव व भारताचा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या विश्वविक्रमाने नावलौकीक मिळवणारा क्रिकेटपटू श्री. सचिन रमेश तेंडूलकर यांना भारत सरकारचा सर्वोच्च सन्मान "**भारतरत्न**" पुरस्कार देण्यात येऊन गौरविण्याच्या निर्णयाचे या सभागृहाच्या वतीने स्वागत करण्यात येत असून या दोन उत्तुंग व्यक्तीमत्वांचे महापालिकेच्या वतीने अभिनंदन करण्यात यावे अशी सूचना करतो.

**मा.उल्हास शेटटी** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न श्री.सचिन रमेश तेंडूलकर यांना मानपत्र देण्यात येवुन त्यांचा गौरव करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर -** भारताचे जेष्ठ शास्त्रज्ञ सीएनआर राव व भारताचा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या विश्वविक्रमाने नावलौकीक मिळवणारा क्रिकेटपटू श्री. सचिन रमेश तेंडूलकर यांना भारत सरकारचा सर्वोच्च सन्मान "**भारतरत्न**" पुरस्कार देण्यात येऊन गौरविण्याच्या निर्णयाचे या सभागृहाच्या वतीने स्वागत करण्यात येत असून या दोन उत्तुंग व्यक्तीमत्वांचे महापालिकेच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बजेट पास होऊन साधारण ८ महिने व्हायला लागले विकासाच्या कामाचा अजून काही पत्ता नाही. मुख्यालयाच्या २ टेंडर काढण्यात आले. पहिले २५ लाखाचे, काही वॉर्डात ५, काही वॉर्डात १० लाखांचे नंतर २५ लाखांचे टेंडर काढले. त्याच्या वर्कऑर्डरचा काही पत्ता नाही. सगळ्या कामांना वर्क ऑर्डर दिलेली नाही. नवीन कामांना दिली आहे. गेल्या वर्षी कमिशनर नवीन होते. कार्पोरेटर नवीन होते. इलेक्शन झाल्या होत्या म्हणून कामे झाली नाहीत. नागरीकांना समजून सांगणे फार कठिण झाले आहे. या वर्षी तरी नगरसेवकांची कामे होणार अशी अपेक्षा होती. विचार करा, जर डिसेंबरमध्ये वर्कऑर्डर दिल्या असे तुम्ही सांगितले. परत अडीच ते तीन महिन्यांत बजेट खर्च होणार का,

काम होणार का? एफ.डी. वाढवण्यापेक्षा डेव्हलपमेंट झाली पाहीजे. आम्ही एफ.डी. वाढवण्यासाठी इथे आलो नाहीत. आम्ही लोकांना दिलेला शब्द पूर्ण केला पाहीजे. डांबरीकरणावर टेंडर नाही. वर्कऑर्डर दिलेली नाही. याबद्दल बजेटमध्ये बोलताना सांगितले होते, वर्कऑर्डर लेट दिली तर कसे होईल. बजेट झाल्यानंतर जून, जुलै मध्ये टेंडर काढून कमीत कमी सप्टेंबर, ऑक्टोबर मध्ये तरी कामे व्हायला पाहीजेत. डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च गेला की जास्त कॉन्ट्रॅक्टर काम करत नाही. २/३ महिन्यांतील वर्कींग डेज ७० दिवससुद्धा नाहीत. या ७० दिवसांत पूर्ण बजेटचे काम करणार आहोत का? होऊ शकणार नाही? कसे करायचे? अधिका-यांना याचे दुःख नाही. अधिका-यांना प्रमोशन मिळत जाणार. त्यांना काही फरक पडत नाही. यावर्षी काम होवो, पुढील वर्षी होवो तुम्हाला फरक पडत नाही. पण आम्हाला फरक पडतो. आम्ही एफिशियन्सी दाखवली नाहीतर आमचे रिन्युअल होणार नाही. आम्हाला कोणी वोट देणार नाही. पब्लिक काय म्हणणार, तुम्ही शब्द दिला होता. परंतू शब्द पूर्ण केला नाही. किती प्रोजेक्टमध्ये रिशेड्युलिंग चालले आहे. अधिकारी ऑटोमॅटीक वर्ष वाढवून देतात. एक वर्ष, दोन वर्ष, तीन वर्ष. सिमेंट वाढले की रेट वाढवून देतात. याचा तोटा महापालिकेला सहन करावा लागतोय. किती दिवस झाले हे काम चालू आहे. नवीन नवीन प्रोजेक्ट मोठमोठे प्रोजेक्ट अजून हातात घेतले नाहीत. शहर वाढते आहे तसे इन्फ्रास्ट्रक्टर देखील वाढले पाहीजे. त्या दृष्टीने कामे व्हायला पाहीजेत. आता म्हणताय एलबीटीमध्ये इन्कम कमी आहे, त्यात इन्कम कमी नाही. परवाच असिस्टंट कमिशनर श्री. माने यांच्याबरोबर मी बोललो आहे. ते फार उत्साही आहेत. त्यांनी सर्क्युलर पाठवले आहे. त्यांना आत्मविश्वास आहे. त्यांनी ज्याप्रमाणे इनिशिएटीव्ह दाखवला, त्याप्रमाणे आपल्याला लॉस होणार नाही, लॉस कमी होईल. पण एलबीटीचे कारण दाखवून कामे करायची नाहीत हे म्हणणे चुकीचे आहे. कमिशनर स्ट्रेट फॉरवर्ड आहेत. पैसे खात नाहीत. सगळ्या गोष्टींत चांगले आहेत. फक्त विकासाच्या कामात कुठे कमी पडतात हे आम्हाला समजत नाही. बाकी लोक खाऊन-खाऊन गेले तरी ते काम करत होते. त्यामुळे त्यांच्यावर बोंबाबोंब होत नव्हती. तुमचे प्रशासकीय नियंत्रण, डिसिप्लिन, स्ट्रेट फॉरवर्डनेस, अनकरप्टीव्ह इमेज हे सगळे असले तरी डेव्हलपमेंट होत नाही म्हणून बोंबाबोंब चालू झाली आहे. का कामे होत नाहीत. तुम्ही आम्हाला सांगितले होते, सप्टेंबर एण्डपासून ऑर्डर द्यायला सुरुवात होईल. ऑक्टोबर पर्यंत सगळ्या वर्कऑर्डर मिळणार. किती टेंडर काढले, किती वर्कऑर्डर दिल्या. १० लाखांचे टेंडर काढू शकतो तरी ५ लाखांचे टेंडर काढले आहे. मी आधीच म्हणालो होतो, ३०/४० टक्के बिलो टेंडर मंजूर करु नका. कामे होणार नाहीत. एक रुपयाचे काम ७० पैशात होते. ७० पैशांत सुद्धा होत नाही. कोणताही माणूस सांगेल, रुपयाचे काम पन्नास पैशात होताना तुम्हाला क्वॉलिटी मिळणार नाही. अडीच महिन्यांत वॉर्डात कामे करताना कामे करण्यासाठी पैसा मिळणार नसतील तर, उत्तर काय

द्यायचे. प्रश्न असा आहे की, सगळ्या गोष्टींत महापालिका लिडमध्ये असताना डेव्हलपमेंट संदर्भात, कामासंदर्भात काय घडतेय हे आम्हाला सांगायला पाहीजे. इंजिनिअर म्हणतात, आम्हाला अतिक्रमण कारवाई करायला जावे लागते. मिटींगला जावे लागते. नवीन फंडा काय आहे तर सगळी कामे सुपरवायजर करतो. इंजिनिअर लोकांना कुठेतरी सेन्सेसच्या कामासाठी पाठवले आहे. दुसरीकडे तुम्ही त्यांना वापरले, तर त्यांना एक्सक्युज मिळाला आहे. त्यांना ओव्हरटाईम देत नाही. त्यांना ओव्हरटाईम सुरु करा. अधिकारी कमी आहेत. त्यांना तुम्ही ओव्हरटाईम देणार नाही. परत त्यांना दुस-या कामासाठी पाठवणार, मग विकासाची कामे होणार नाहीत. मला स्पष्टीकरण पाहीजे – १) टेंडरची ऑर्डर का दिली नाही? २) आयुक्त म्हणून तुम्हाला रुल्स मध्ये गव्हर्नमेंटचा ८८-८९ च्या जी.आर नुसार १५ टक्के वर दिले असेल तर द्यायची गरज नाही. बिलो टेंडर का देता, फार डेंजर आहे. डांबरी कामे बिलो रेटने करतात. सिमेंटमध्ये पाणी टाकतात. ४ लेअर करायचे असतील तर ३ लेअरमध्ये वेस्ट मटेरिअल टाकतात. एकामध्ये चांगले मटेरिअल टाकतात. काय उपयोग आहे? मग इंजिनिअर घाबरतो. अधिकारी कॉन्ट्रॅक्टरमध्ये भांडणे होतात, काम होत नाही. आम्ही इथे डेव्हलपमेंटसाठी आलेलो आहोत. नागरीकांना उत्तर द्यावे लागते. डेव्हलपमेंट ही फर्स्ट प्रायोरिटी आहे. अनधिकृत बांधकामांसदर्भात सरकारने कोणत्याही इन्स्ट्रक्शन्स दिलेल्या नाहीत. तुम्हाला टार्गेट केले आहे. तुम्हाला अनधिकृत बांधकामासाठी वेळ द्यावाच लागतो. ज्याअर्थी तुम्हाला इन्स्ट्रक्शन्स दिल्या, त्याअर्थी तुम्ही करणार आहात. तुमच्या कर्मचा-यांना काम करायला लावा, डबल ओव्हरटाईम द्या. मी सुद्धा इंटर स्टेटमध्ये काम केले होते. आम्हाला सुद्धा ओव्हरटाईम मिळाला तर आम्हाला वेळ मिळत नाही असे तुम्ही म्हणून शकत नाही. हे सगळे कन्सीडर करायला पाहीजे. जे अधिकारी तुम्हाला भ्रष्ट वाटतात. त्यांना काढून टाका. मेमो इश्यू करा. कोणताही मेजर प्रोजेक्ट उदा. ट्रान्स्पोर्ट नगरमध्ये सेक्टर २३ मध्ये पार्किंग करायचे म्हणून दीड वर्षांपूर्वी जी.बी. विषय केला आहे. वर्षभर विषय फिरला आहे. विषय सारखा प्रत्येक टेबलला जातो. पुश होत नाही. दीड वर्षे एक प्रोजेक्ट पुढे जात नसेल तर ५ वर्षांत किती प्रोजेक्ट करणार? या सगळ्यांची उत्तरे तुम्ही द्यायला पाहीजेत. सिटी इंजिनिअर किंवा कोणाला तरी उत्तर द्यायला लावा. मी सत्य बोलतोय. पेपरमध्ये छापून आणण्यासाठी बोलत नाही. पोटतिडकीने बोलतोय. २८ वर्षांत काम करत असताना ही पहिली वेळ आहे, पैसे असून सुद्धा कामे होत नाहीत. मी कमिशनर यांना विनंती करतोय, टॉप प्रायोरीटीने घ्या. अधिका-यांना ओव्हरटाईम द्या. डेव्हलपमेंटची कामे करायला सांगा. ३० ते ४० टक्के बिलो टेंडर मंजूर करु नका. त्यामध्ये बी ग्रेड, सी ग्रेड काम होईल. मी मा.अजितदादा पवार असतानाही हा प्रश्न मांडला होता. कमिशनर म्हणून संविधानाने तुम्हाला खूप अधिकार दिले आहेत. टेंडर नोटीसमध्ये सुद्धा आहे. काही कारण न देता तुम्ही ते नाकारु शकता. कशाला एवढे बिलो टेंडर मंजूर करायचे? काही लोकांवर

माहिती असूनसुद्धा तुम्ही आल्याबरोबर †क्शन घेत नाही. कोणत्याही गोष्टीसाठी एच.ओ.डी. जबाबदार आहे. त्याच्याबरोबर सर्वांची जबाबदारी आहे.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) –** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, चालू वर्षांच्या बजेट पोझिशनमध्ये दि.३१ ऑक्टोबर अखेर ८९० कोटी आपल्याकडे जमा आहेत. ६३६ कोटी खर्च झाले आहेत. त्यापैकी ४५७ कोटी महसूली खर्च व १७९ कोटी भांडवली खर्च आहे. भांडवली खर्चाबाबत चर्चा चालू आहे. चर्चा करताना सर्वसाधारणपणे हा सार्वत्रिक अनुभव आहे. महसूली खर्च दरमहा व भांडवली खर्च एकदम होतो. आस्थापना खर्च महसूली खर्चात धरला आहे. दि. १ एप्रिल पासून महसूली खर्च व भांडवली खर्च शेवटचे ४ महिने जास्त आहे. निविदा प्रक्रिया, जागा आयडेन्टीफाय करुन रेक्टीफाय करणे, निविदा प्रसिद्ध करणे, करणे, स्थायी समिती किंवा सक्षम समितीची मान्यता घेऊन करारनामा करणे, या टप्प्यांत ३/६ महिने कालावधी प्रत्येक महापालिकेत लागतो. या वर्षीचा भांडवली खर्च दोन वर्षांपेक्षा निश्चितपणे जास्त आहे. २०११-१२ मध्ये १६६ कोटी खर्च झाला होता. २०१३-१४ मध्ये १७९ कोटी खर्च झाला होता. सन्मा. सदस्यांनी २ वर्षांपूर्वीची परिस्थिती नमूद केली. त्यापेक्षा जास्त भांडवली खर्च झाला आहे. वस्तुतः कामाची आकडेवारी सादर करणे आवश्यक आहे. दि. १६ नोव्हेंबर २०११ रोजी एकूण ५२२ कामाची वर्कऑर्डर दिलेली आहे. कामे सुरु झाले आहे. ११५ कामांचा करारनामा झाला आहे. काम सुरु करायचा आदेश या आठवड्यात दिला जाईल. ६१० कामांची निविदा उघडण्यात आली आहे. करारनामा करणे बाकी आहे. काम सुरु करायचा आदेश दिला जाईल. यासाठी आजपासून २/३ आठवडे लागतील. २४१ कामांची निविदा प्रसिद्ध झाली आहे. निविदा उघडून वर्कऑर्डर देणे, करारनामा करणे, बाकी आहे. एकूण १५ ४८ कामांची निविदा प्रसिद्ध झाली आहे. उरलेल्या कामांची २/३ आठवड्यांत त्या-त्या स्टेजला वर्कऑर्डर दिली जाईल.

**मा.आर.एस.कुमार –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सगळ्या नगरसेवकांना विचारा. माझ्या वॉर्डात प्रभागांची कामे सोडलीतर मुख्यालयातील काहीच काम सुरु नाही. असेच अनेक वॉर्डांत आहे. अधिकारी तुम्हाला चुकीची माहिती देतात. वर्कऑर्डर दिली असती तर कामे सुरु झाली असती.

--------------

## <u>प्रश्नोत्तरे</u>

**मा.महापौर -** प्रश्नोत्तराचा तास फक्त अर्धा तास आहे. मा.अश्विनीताई चिंचवडे यांनी विचारलेल्या विषयावर कोर्टाचा निर्णय प्रलंबित असल्यामुळे या विषयावर चर्चा करु शकत नाही.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, कायदा सल्लागार यांनी सांगावे, महापालिका सभेमध्ये चर्चा करायची नाही असे कोर्टाचे आदेश आहेत का?

**मा.सतिश पवार (अति.कायदा सल्लागार) –** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, मी महापालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण २ याच्या कलम ५ (ई) नुसार पुढील प्रकारचा कोणताही प्रश्न विचारता कामा नये. त्यात मत व्यक्त करण्याविषयी कायदेशीर जे प्रश्न त्याअनुषंगाने असतील (२) जो प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे भारताच्या प्रदेशातील कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे प्रलंबित कायदा किंवा कारवाई संबंधी असलेला कोणताही प्रश्न.

**मा.सिमा सावळे –** मा.महापौर साहेब, कोणते कलम आहेत, कोणते प्रश्न प्रलंबित आहेत ते सांगा.

**मा.सतिश पवार (अति.कायदा सल्लागार) –** हा विषय पेंडींग आहे म्हणून त्याविषयी स्पेसिफीक डायरेक्शन्स ऑर्डर झालेल्या आहेत. या प्रश्नावर चर्चा करता येणार नाही अशी प्रोव्हिजन आहे. प्रश्नावर चर्चा करता येणार नाही. उत्तरे देता येतील

**मा.नारायण बहिरवाडे –** मा.महापौर साहेब, मग तुम्ही विचारलेल्या प्रश्नांना लेखी उत्तरे कशी दिली याचे उत्तर द्यावे.

**मा.सतिश पवार (अति.कायदा सल्लागार) –** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, हा विषय न्यायालयात प्रलंबित आहे. त्याविषयी चर्चा करता येणार नाही. उत्तर देता येऊ शकेल. न्यायालयात वादाचा जो विषय आहे त्यावर चर्चा करता येणार नाही.

**मा.महापौर –** प्रश्नांची उत्तरे देता येतात, चर्चा करता येत नाही, असे त्यांनी सांगितले आहे. .

**मा.नारायण बहिरवाडे –** मा.महापौर साहेब, त्यांनी कलम सांगावा.

**मा.आश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत झोपडपटटी पुनर्वसन योजना, घरकुल योजना, पवना थेट पाईपलाईन याबाबत आम्ही नव्याने

निवडून आलेलो नगरसेवक अनेकवेळा सभागृहात चर्चा, वृत्तपत्रातून लेख, अग्रलेख वाचतो, ऐकतो....

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, महापौर या विषयावर चर्चा करायची नाही म्हणालात. मग कशाला बोलू देताय.

**मा.सिमाताई सावळे**– चर्चा करायची नाही म्हणाले म्हणजे बोलायचे नाही असे नाही.

**मा.सुलभाताई ऊबाळे –** चर्चा करायची नाही. पण नवीन नगरसेवकांना बोलू द्या.

**मा.आश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत झोपडपटटी पुनर्वसन योजना, घरकुल योजना, पवना थेट पाईपलाईन याबाबत आम्ही नव्याने निवडून आलेलो नगरसेवक अनेकवेळा सभागृहात चर्चा, वृत्तपत्रातून लेख, अग्रलेख वाचतो, ऐकतो. यातून काही बाबी प्रकर्षाने निदर्शनास येतात की, वरील सर्व महत्वाकांक्षी प्रकल्प राबवताना सुरुवातीपासून कटिबध्दाय जनहिताय या महापालिकेच्या ब्रिदवाक्याप्रमाणे महापालिकेचे, करदात्यांचे हित लक्षात घेऊन प्रकल्प राबविले की ठेकेदार, सल्लागारांचे हित जोपासण्यासाठी असा प्रश्न पडतो. हे प्रकल्प नागरी हिताचे आहेत. या प्रकल्पामधून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना, वंचितांना, झोपडपटटीधारकांना महापालिका घरे (निवारा) उपलब्ध करुन देणार आहे. पवना थेट पाईपलाईन मधून शहरातील पाण्याची समस्या दूर होणार आहे. हे चांगले उददेश, हे चांगले मेसेज समाजापर्यंत, नागरीकांपर्यंत जाण्याऐवजी जे.एन.एन.यु.आर.एम. चे प्रकल्प अर्धवट, मुदत संपली, नव्या मुदत वाढीस अवघे काही महिने उरले आहेत, झोपडपटटी पुर्नवसनाचे नियोजन फसले, सहा वर्षात काम अपूर्णच. करदात्यांचे कोटयावधी रुपये पाण्यात जाण्याची शक्यता, लाभार्थींच्या भावनांशी खेळ, या प्रकल्पात भले कोणाचे? मावळ गोळीबार, शेतकरी मृत्यूमुखी अशा वृत्तपत्रामधून शहरामध्ये नागरीकांमध्ये चर्चा सुरु आहे याचा अर्थ असा होतो की, एकेकाळी श्रीमंत नगरपालिका असा नावलौकिक असणा-या नगपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाल्यानंतर महापालिकेच्या प्रतिष्ठेचे अवमुल्यन, कमीपणा तसेच लाभार्थींचे स्वप्न धुळीस मिळणार. कोटयावधी रुपये खर्ची पडून देखील नियोजनांच्या अभावामुळे प्रकल्प रखडले असे मेसेज या महत्वाकांक्षी प्रकल्पामधून नागरीकांपर्यंत जात आहेत. या सर्व प्रकल्पांबाबत महानगरपालिकेच्या या सर्वोच्च सभागृहामध्ये ज्येष्ठ नगरसेवक आप्पा बारणे, भाऊसाहेब भोईर, आर.एस.कुमार, सिमाताई सावळे, सुलभाताई उबाळे, मंगलाताई कदम, प्रशांत शितोळे, राजेंद्र जगताप, अजित गव्हाणे, दत्ता साने, उल्हास शेटटी अशा सर्वपक्षीय नगरसेवकांनी सकारात्मक भूमिकेतून प्रकल्पांमधील

त्रुटी, चुका मा.महापौर, मा.आयुक्त पोटतिडकीने आपल्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. परंतू आजरोजी दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरामध्ये प्रकल्प वेळेत पुर्ण न झाल्यामुळे महापालिकेचे अधिकारी, कर्मचारीवर्ग यांचे मनुष्यबळ, श्रम, वेळ, पैसा, प्रतिष्ठा हे झालेले नुकसान यास जबाबदार कोण? याची जबाबदारी निश्चित करुन नुकसान भरपाईबाबत कार्यवाही केली आहे का? महापालिकेचे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर यांची शैक्षणिक अर्हता, कामाचा प्रदीर्घ अनुभव, तसेच नेमलेले कन्सलटंट (सल्लागार) यांचे नियंत्रण, मार्गदर्शन असून सुध्दा प्रकल्पामध्ये त्रुटी राहणे या बाबी का घडल्या? याबाबत उत्तरे देण्यात आली नाहीत. तसेच महाराष्ट्र महापालिका कायदा तरतुदीनुसार गृहीत गोष्टींच्या अनुषंगाने प्रश्न विचारता येत नाहीत असे म्हटले आहे. परंतु करारनाम्याच्या अटी-शर्तीनुसार भविष्यांत करण्यात येणा-या कामापोटी, भाववाढ फरकापोटी रक्कम ठेकेदारास महापालिकेतर्फे देय राहील. सदर मुदत वाढीच्या काळात विविध अटी-शर्तीनुसार भाववाढ देण्यात येते की भविष्यवाणी आवर्जुन उत्तराद्वारे केलेली आहे. याचा अर्थ महापालिकेच्या तिजोरीत खडखडाट झाला तरी चालेल पण ठेकेदाराचे हित महत्वाचे आहे. करारनाम्यातील अटी-शर्ती करताना फक्त ठेकेदाराच्या हिताच्याच गोष्टी लक्षात घेण्यात आल्या होत्या का? महापालिकेच्या हिताच्या अटी-शर्ती करारनाम्यात आहेत की नाहीत? या अटी शर्ती अधिका-यांनी तयार केल्या की सल्लागारांनी? बंद पाईपलाईनचे ८.८० कि.मी. पाईपलाईन कामासाठी लागणारे पाईप साहित्य खरेदी करणे. तेवढेच केलेल्या कामापुरते पेमेंट देणे अपेक्षीत होते. तर मग १४२ कोटी रु. पेमेंट देण्याचा निर्णय अधिका-यांचा की सल्लागाराचा आहे? जमिन ताब्यात नसताना देखील निविदा मंजूर करीत आहोत याकरिता केंद्र व राज्य शासनाचे संबंधित विभागाचे मार्गदर्शन घेण्यात आले होते का? ही जबाबदारी कोणाची होती? याबाबत जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर कारवाई का करण्यात आली नाही? याचे उत्तर मा.आयुक्तांनी सभागृहास द्यावे ही विनंती. प्रकल्पांना उशिर होण्यासाठी शेतक-यांचे आंदोलन, महाराष्ट्र शासनाची वाळू उपसा बंदी, नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, पर्यावरण दाखला, सुधारीत परवानगी विलंब, खोदकाम करताना पाण्याच्या पाईपलाईनचे स्थलांतर या प्रक्रियेमध्ये सामाजिक कामामुळे उशीर होतो असे उत्तर आहे. म्हणजे बंद पाईपलाईन प्रकल्पास ३४ कि.मी. जागा पुर्णपणे ताब्यात नसताना शेतक-यांना विश्वासात न घेता प्रकल्प सुरु केला त्यात काही चूक शेतक-यांची आहे का? पर्यावरण दाखला, सुधारीत बांधकाम परवानगी ही वेळेवर घेण्याची जबाबदारी कोणाची होती? इमारतीच्या पायासाठी खोदकाम करताना पाण्याची पाईपलाईन जागेतून गेल्यामुळे तिचे स्थलांतर मैला उपसा केंद्रातून येणा-या सांडपाण्यामुळे ही चुकीची उत्तरे दिली आहेत, त्याचा खुलासा व्हावा. कुठलाही प्रकल्प राबवत असताना अशा अडचणींना सामोरे जावेच लागते. आश्चर्य म्हणजे अतिवृष्टीमुळे प्रकल्पास विलंब होत आहे असे उत्तर देऊन निसर्गाला देखील दोषी ठरवलेले आहे.

परंतु या प्रकल्पाचे सुरुवातीपासून काम पाहणारे अधिकारी तसेच नेमलेले सल्लागार, ठेकेदार यांचे माध्यमातून कोटयावधी रुपये खर्च होऊन सुध्दा त्यांची कुठेही चुक झालेली नाही असे प्रशासनाचे म्हणणे आहे का? एल.बी.टी. लागू झाल्यामुळे जकातीच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न व एल.बी.टी.च्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न तपासल्यास भविष्यात विकासकामांना निधी कमी पडणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या दृष्टीने या प्रकल्पांमध्ये झालेल्या त्रुटी, चुका यांची पुनरावृत्ती होऊ नये त्यासाठी या प्रकल्पाचे भविष्यकालीन नियोजन करण्यासाठी मा.महापौर, मा.आयुक्त आपणास कठोर पावले उचलावीच लागणार आहेत. कारण प्रत्येक प्रभागातील मुलभूत नागरी सुविधांबाबतची कामे देखील महत्वाची आहेत. या तीन प्रकल्पांमध्येच महापालिकेचे कोटयावधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. या विषयांवर अनेकवेळा तासनतास चर्चा झाली. परंतु कारवाई झाली नाही ती व्हावी ही विनंती. भविष्यात हे प्रकल्प पूर्ण करत असताना या प्रकल्पांच्या त्रुटी, चुका, विलंबास जबाबदार असणा-या अधिका-यास खडयासारखे बाजूस काढले पाहिजे. नाहीतर महापालिकेची स्थिती “आंधळे दळते, कुत्रे पीठ खाते” अशा पध्दतीची झाल्याशिवाय राहणार नाही. मला या उत्तरादरम्यान न मिळालेली उत्तरे सभागृहात देण्यात यावीत ही विनंती. वरील प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्यामुळे महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी वर्ग यांचे मनुष्यबळ, पैसा, श्रम, प्रतिष्ठा हे झालेले नुकसान यास जबाबदार कोण? हे तपासून त्याची जबाबदारी निश्चित करुन नुकसान भरपाईबाबत काही कार्यवाही करावी. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून झालेल्या पवना थेट पाईपलाईन प्रकल्पाच्या कामाचे लेखा परीक्षणामध्ये (तीन आक्षेप) व झोपडपटटी पुनर्वसन, घरकुलामधील (नऊ आक्षेप) सभागृहासमोर मांडण्यात आले आहेत. त्याचा तपशील मागितला होता तो का देण्यात आला नाही याचे उत्तर सभागृहास द्यावे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, काळ सोकावत आहे हे लक्षात घेऊन दोषींवर कारवाई झालीच पाहिजे. जर संबंधितांनी त्यांचे काम चोख व योग्य रितीने बजावले असेल तर त्यांचा महापालिकेच्या वतीने जाहिर सत्कार करावा. अन्यथा प्रकल्पातील त्रुटी, दोष, विलंब यांस जबाबदार कोण? त्याची जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर कारवाई करावी. याबाबत मा.महापौर, मा.आयुक्त आपण निर्णय घ्यावा. कारण यापुर्वी अनेकवेळा सभागृहामध्ये अनेक नगरसेवकांनी हिच मागणी केलेली आहे. परंतू आजच्या उत्तरानुसार कारवाई झालेली नाही हा सभागृहाचा अपमान आहे. झोपडपटटी पुनवर्सन प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून कन्सेंट टू ऑपरेट प्राप्त झालेले नाही. त्याबाबत सभागृहास माहिती मिळावी. सभागृहातील प्रश्नोत्तरामध्ये दिलेली उत्तरे म्हणजे कागदी घोडे नाचवणे, वेळ मारुन देणे, गोलमोल उत्तरे देणे, सभागृहाची दिशाभूल करणारी उत्तरे आहेत. वरील प्रकल्पांमध्ये आजरोजीपर्यंत संबंधित अधिकारी, ठेकेदार, सल्लागार यांचेमुळे महानगरपालिकेला कोटयावधी रुपयांचे नुकसान होऊन सुध्दा त्यांच्यावर कारवाई झाल्याचे

उत्तरांमध्ये कुठेही नमूद नाही. तरी कन्सलटंट (सल्लागार) यांनी दिलेले सर्व प्रकल्पातील सल्ले, अभिप्राय, तपासून त्यांना व ठेकेदारांची कार्यपध्दती तपासून संबंधितावर कारवाई करावी व सबंधित अधिका-यांची देखील चौकशी करुन त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. मा.शमीम पठाण यांनी माझ्यासारख्या नवीन नगरसेविकेचा अपमान केला आहे, त्यांचा मी निषेध करते.

**मा.उल्हास शेटटी –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कोणत्याही सदस्याने जे प्रश्न विचारले ते शहराशी संबंधित असणारे असतात. मी झोपडपट्टी संदर्भातील प्रश्न बोलणार आहे. त्यांनी विचारले. आम्ही विचारले काय एकच प्रश्न आहे. आमच्यासारख्यांना दुसरा पोर्टफोलियो नाही. मग कुठे बोलणार? मला स्टॅण्डींग द्या मी तिथे बोलतो. मी चिंचवडे ताईंचे अभिनंदन करु इच्छितो की, त्यांनी झोपडपट्टीचा विषय काढला आहे. त्यामुळे मला बोलायची संधी मिळतेय. आयुक्त साहेब, हा प्रश्न उपस्थित केला. सीटी हॉल इथे बोललो, आज अजंठानगर बद्दल वारंवार बोललो आहे. अधिका-यांना सांगा, झोपडपट्टीत जाऊन लोकांना सांगा, काय प्रॉब्लेमस् आहेत. एसटीपी, कन्सेन्ट टू ऑपरेट हे विषय त्यांना कळणार नाही. बाकीच्यांना घरे मिळाली. मात्र ज्यांना मिळाली नाहीत, त्याचे कारण कळाले पाहीजे. सगळ्या झोपडपट्टीधारक ज्यांच्या घरांचे ड्रॉ झाले आहेत. त्यांचा मोर्चा आमच्या घरी येतो. तुमच्या बिल्डींगमध्ये आल्यानंतर वॉचमन सोडत नाही. माझ्या घरी रोज १०० लेडीज येऊन बसतात. ६/६ महिने झाले त्यांच्याशी मी खोट बोलतोय, एक महिन्यात होईल. तुमचे राजन पाटील, तांबे साहेब यांना कधीही फोन केलातरी ते म्हणतात, मी कोर्टात आहे. याचा अर्थ काय.व्यवस्थित उत्तर देत नाही. जुन्या लोकांनी ज्या काही अडचणी क्रिएट केल्या आहेत, त्याचे परिणाम तुम्हाला भोगावे लागत आहेत. आम्ही काय उत्तर द्यायचे. लोकांना लोन दिलेले आहेत. लोनचे हप्ते चालू झालेले आहेत. त्यात नाही त्या प्रकारचे राजकारण चालू आहे. तुम्ही उत्तर देता, १० दिवसांत होईल, उद्या होईल. त्यांना सांगा, तुम्ही जनजागृती करा, अशा अशा अडचणी निर्माण झाल्या आहेत. एसटीपी न केल्यामुळे कन्सेन्ट टू ऑपरेट मिळाले नाही म्हणून तुम्हाला घरे देता येत नाहीत. आम्ही किती लोकांना सांगणार. यासंदर्भात तुमच्याकडे मी कंटिन्यू फॉलोअप करतोय. तुम्हाला सारखा त्रास द्यायला बरे वाटत नाही. यावर तोडगा काढा. मला सांगा, विदाऊट कन्सेन्ट टू ऑपरेट कशी घरे दिली. यावर सोल्यूशन काढू शकत नाही का. किती दिवस असे चालणार. ३ बिल्डींगज् झाले आहे. काम संपले आहे. एक वर्षापूर्वी घरे देणार होतो. अजून हे काम झालेले नाही. आम्हाला, गावडे साहेबांना याबाबत माहिती आहे. ड्रॉ काढून एक वर्ष झाले आहे. लोकांना लोन देत नव्हते तर गावडे साहेबांनी प्रयत्न करुन बँकांना लोन द्यायला लावले होते. तांबे साहेबांना सांगायचे असले तरी ते ऑफिसमध्ये कधीच उपलब्ध नसतात. ते ३

महिन्यांत एकदातरी येऊन भेटले का. यावर गांभिर्याने विचार करावा. रोज माझ्या ऑफिसला, घरी मोर्चा येतो. तुम्हाला तरी गार्ड आहेत. आम्हाला गार्ड नाही. आम्हाला काय झालेतर कोण जबाबदार?

**मा.दत्ता साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, गेल्या २० तारखेच्या महापालिका सभेमध्ये प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून एक अतिशय गंभीर गोष्ट सभागृहासमोर मांडायचा प्रयत्न करतो आहे. अग्निशामक विभागाच्या माध्यमातून शहरात जिथे वेगवेगळ्या प्रकारची आपत्ती घडत असताना अग्निशामक विभाग शहरातील वेगवेगळ्या भागांत काम करत असतो. मी अग्निशामक विभागाच्या माध्यमातून यापूर्वी २००१ च्या दरम्यान आपल्याला हे माहित असावे व याची गांभिर्याने दखल घ्यावी. म्हणून हा विषय सभागृहापुढे आणला आहे. मा.आयुक्त साहेब, आपण आल्यानंतर सगळ्या विभागांत लक्ष दिले. पण अग्निशामक विभागाच्या माध्यमातून काय चालले आहे, काय घडलेय ते कदाचित आपल्याला कळाले नसेलही. गेल्या दीड/दोन वर्षांत काय प्रकार घडला आहे, हे आपल्या निदर्शनास आणून देण्याचा मी प्रयत्न करतो आहे. याची गंभीर बाब म्हणून नोंद घ्याल म्हणून हा विषय मांडतो आहे. मी प्रश्न विचारला होता, अग्निशामक विभागाचे श्री.के.बी. गावडे यांना का सेवानिलंबित केले होते? या सरळ सरळ मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे –अग्निशामक विभागासाठी सन २०००-२००१ मध्ये वाहने व साहित्य खरेदीमध्ये निश्चित केलेल्या मानांकानुसार/निकषानुसार ठेकेदाराकडून साहित्य न स्विकारता अग्निशामक अधिकारी यांनी चुकीचे साहित्य स्विकारल्याचे व मनपाचे आर्थिक नुकसान केल्याचे स्पष्ट झाले आहे. वस्तुतः अग्निशामक विभाग हा अतिशय संवेदनशील विभाग असताना, इतर लोकांचा जीव वाचवायचे काम करत असताना जर चुकीची घटना घडलीतर त्याची काय किंमत मोजावी लागेल. मध्यंतरी भोसरी इथे वायु गळती झाली होती. आपल्या जवानांनी त्यांच्या जीवाचे रान करुन परिस्थिती नियंत्रणात आणली होती. काही माणसांचे प्राण वाचवायचे काम केले होते. आपला अधिकारी खालच्या दर्जाचे काम करत असेल, त्यांनी ज्या वस्तू घेतल्या त्या चुकीच्या आहेत हे सिद्ध झाले असताना त्यांना या पदावर सन्मानाने ठेवणे ही निंदनीय बाब आहे. त्यांना या पदावर का ठेवले आहे. याच्या पाठिमागे कोणी गॉडफादर आहे का असे वाटते आहे. २००८ च्या आदेशान्वये खातेनिहाय चौकशीतून त्यांना सेवानिलंबीत केले होते. त्यांची चौकशी झाली का नाही याचे उत्तर दिले नाही. खातेनिहाय चौकशी करत असताना उत्तर द्यायला काय होते. काही लोकांनी याची उत्तरे व्यवस्थितरित्या झाकून ठेवली आहेत असा माझा आरोप आहे. अग्निशामक विभागाचे अधिकारी यांच्यावर आरोप सिद्ध झाले असले तरी त्यांच्यावर जे आरोप ठेवण्यात आले आहेत ते मी वाचून दाखवतो. (प्रश्न क्र. १ अ) चे उत्तर वाचून दाखवले.) वरील

५ आरोप श्री. के.बी. गावडे, अग्निशामक अधिकारी यांच्यावर सिद्ध झाले असताना, सगळा प्रकार डोळ्यासमोर असताना, एवढी मोठी गंभीर बाब समोर आली असताना, सभागृहात २००२ दरम्यानचा विषय सभागृहासमोर आला असताना, तुम्ही असा अधिकारी जाणूनबुजून ठेवला आहे का. या माध्यमातून आपण यांच्या पाठिमागे आहात का, यांना आपला सपोर्ट आहे का असा आरोप मी आपल्यावर करतोय. कारण आपण प्रशासनाचे मुख्य आहात. आपण चांगले अधिकारी आहात हे मला अजूनही वाटत नाही. हे मी सगळ्या सभागृहाला सांगतोय. एवढा मोठा गंभीर विषय असताना, जीवनमरणाचा विषय असताना लोकांना वेगवेगळ्या माध्यमांतून त्रास होत असताना, सगळी माहिती असताना हा अधिकारी पिंपरी चिंचवड महापालिकेत अग्निशामक अधिकारी या पदावर अजूनही का बसला आहे, हा अधिकारी आपण पोसला आहे का असा मला प्रश्न पडतोय. १३ वर्षे झाली हा अधिकारी अजूनही या पदावर बसला आहे. तुम्हाला दुसरा अधिकारी मिळाला नाही का. हा अधिकारी इथे काय करतोय. किती उद्योगी बाळ आहे. काय-काय करतोय. किती भ्रष्टाचार केला आहे. माझ्या प्रभागातील करसंकलन विभागातील कर्मचारी श्री.म्हाडे, श्री.काळे, श्री.सुतार असतील, यांची गंभीर दखल घेतली आहे. हे करसंकलन अधिकारी यांनी माझ्या प्रभागात घरांची नोंद केली. घर अधिकृत/अनधिकृत असेल तर मला माहित नाही. पण आपण त्यांना सस्पेण्ड केले. कारण काय तर त्यांनी घरांची नोंद केली होती. अग्निशामक अधिकारी यांनी रु.१०,४०,००००/- चे नुकसान केले आहे. करसंकलन अधिकारी यांनी आपल्या फायद्याचे काम केले होते. त्यामुळे आपल्या तिजोरीत भरच पडणार होती. म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचे काम आपण केले आहे. हे माझे कोणी नातेवाईक नाहीत. एका माध्यमातून आपण महापालिकेचे नुकसान करतोय. गोरगरीब नागरीकांचा पैसा, जनतेचा पैसा उधळपट्टी करायला अधिका-याला इथे ठेवले आहे का असा माझा प्रश्न आहे. या अधिका-याला आपण काय करणार आहात याचे पहिले उत्तर द्यावे. हा सुरुवातीला विषय आहे. पाच वाहने खरेदी करताना कसा खर्च केला हे सविस्तर दिले आहे. ही वाहने खरेदी करताना रु.१,२९,००,०००/- खर्च केला होता. त्या खर्चाच्या माध्यमातून उर्वरीत रक्कम कशा माध्यमातून डिव्हाईड केली याचा उल्लेख नाही. गावडे हे अग्निशामक विभागात अधिकारी झाल्यापासून विभागात असणा-या स्टोअरमध्ये किती उपकरणे आहेत. उपकरणांची खरेदी कधी झाली. शिड्यांची खरेदी कधी केली हा महत्वाचा प्रश्न मांडला आहे. उपकरण खरेदीबाबत उत्तर दिले आहे. या शिड्या सिम्प्लेक्स मेक ब्रँडच्या न घेता दुस-या कंपनीच्या घेतल्या आहेत. आजही या शिड्या कोणत्याही गाडीवर फिट केलेल्या नाहीत. या शिड्या गाडीवर फिट केलेल्या आहेत, असे उत्तर दिले आहे. माझ्याकडे व्हिडिओ शुटींग आहे. मी अग्निशामक विभागात समक्ष गेलो होतो. ही शिडी कमीत कमी 6 लोकांना उचलायला सांगितली तरी ती उचलता येणार नाही. या शिड्या स्टोअरमध्ये पडल्या

आहेत. उत्तर देणा-या महाशयांनी मला उत्तर दिले आहे, शिड्या वापरात आहेत. आत्ता सुद्धा मी तुम्हाला दाखवू शकतो. माझ्याकडे याचे व्हिडिओ शुटींग आहे. जर काही दूर्घटना घडली तर 6 लोक ती शिडी उचलणार का समोरच्या माणसाचे प्राण वाचवणार. अधिका-याकडून महापालिकेच्या पैशांचा असा वापर केला जात असेल, त्याची टक्केवारी चालू असेलतर या विषयात गंभिर्याने लक्ष घातले पाहिजे. मी प्रश्न २ अ) विचारला होता की, पिंपरी चिंचवड शहराचा झालेला विकास, झालेले शहरीकरण, औद्योगिकरण, लोकसंख्येत झालेली वाढ या सर्व गोष्टींचा विचार करता गावडे साहेबांनी अग्निशामक केंद्रांत वाढ करावी यासाठी काय प्रयत्न केले? पिंपरी चिंचवड हे जवळपास १५ ते २० लाख लोकसंख्या असलेले शहर आहे. शहरातील लोकसंख्येप्रमाणे किती युनिटस् असावेत असा प्रश्न होता. याबाबत नॉर्मस् काय ठरले आहेत. एरिया व लोकसंख्येनुसार त्या-त्या भागात किती युनिट घेऊ शकतो. पिंपरी चिंचवड शहरात ४च युनिटस् आहेत. हे महाशय इथे आल्यापासून एकही युनिट वाढवले नाही. १३ लाख लोकसंख्येसाठी १ युनिट दिले आहे. आमच्या भाग १९९७ मध्ये पिंपरी चिंचवड हद्दीत आला. जवळपास १४ वर्षे झाली. २००७ पासून प्रत्येक वेळी सभागृहामध्ये अग्निशामकचा विषय आल्यानंतर आमच्याही भागात एक अग्निशामकचे युनिटी असावे अशी मी अनेक वेळा मागणी केली होती. कुदळवाडीत शेतकरी आहेत, भंगारवाल्यांचा व्यवसाय़ आहे. अतिशय संवेदनशील भाग आहे. संत तुकाराम नगर मधून अग्निशामकची गाडी आमच्या भागात येण्यासाठी १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ जातो. अन्य आपत्ती असली तरी मी या विषयावर अनेक वेळा चर्चा केली असताना संबंधित अधिका-याने किंवा त्यांच्या माणसाने आम्हाला कधीही विचारलेले नाही. तुमची जागा कुठे आहे, कुठे युनिट टाकायचे आहे. या अधिका-याला एवढी मस्ती आली आहे. कोणत्या धुंदीत काम करतात. महापालिकेचा पगार घेत आहात. गोरगरीब जनतेचा करसंकलनातून आलेला पैसा उडवतो. या नालायक अधिका-यासाठी लोकांनी पैसे दिले आहेत का? २००८ ते २०१३ मध्ये एमआयडीसी ब्लॉकमध्ये एकच युनिट चालू आहे. या अधिका-याने आल्यापासून आत्तापर्यंत अग्निशामक विभागाच्या माध्यमातून किती काम केले आहे. मला वाटत नाही, काही काम केले आहे. मी नगररचना विभागाकडून माहिती घेतली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या डी.पी. प्लॅननुसार शहरामध्ये तळवडे, पिंपरी, चोवीसावाडी, दापोडी, दिघी, पिंपरी, भोसरी, मोशी, वाकड व ताथवडे अशा १० ठिकाणी अग्निशामक केंद्राकरीता आरक्षण ठेवले आहे. या आरक्षणांच्या माध्यमातून गावडे साहेबांनी काय-काय काम केले आहे, कुठे-कुठे जागेच्या माध्यमातून जागा ताब्यात घेण्यासाठी, नवीन युनिट स्थापन करण्यासाठी पत्रव्यवहार कोणत्या मार्गाने, कधी केला आहे का याचे सविस्तर उत्तर देण्यात यावे. अग्निशामक विभागातील कर्मचा-यांना नियमानुसार मिळणारा जादा काम केलेला (ओव्हरटाईम) अतिकालीन भत्ता अदा केला आहे का असा मी प्रश्न विचारला आहे. त्याचे उत्तर

दिले आहे, अग्निशामक विभागातील कर्मचा-यांना माहे जून २०१२ चा अतिकालीन भत्ता अदा करणेत आला आहे. पुढील कालावधीतील अतिकालीन भत्ता अदा करणेकामी कार्यवाही चालू आहे. किती सहज उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. भत्ता अदा केला असेल तर अधिका-याला इथे बोलवावे. त्यांनी कोणत्या माध्यमातून कर्मचा-याच्या अकाऊंटमध्ये पैसे दिले, कर्मचा-याचे नाव सांगावे. कोणत्या अकाऊंटमधून पैसे गेले आहेत हे दाखवावे. सन २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ या ३ वर्षांचा अतिकालीन भत्ता दिलेला नाही. अग्निशामक विभागाचे कर्मचारी जीववर बेतून दुस-याचा प्राण वाचवतात. ते अशी कामे करत असले तरी त्यांचा अधिकारी जर कर्मचा-यांना ओव्हरटाईम देत नसेल तर यापेक्षा निंदनीय बाब वेगळी नसेल. अशी चुकीची कामे करणा-या अधिका-याला तुम्ही पाठिशी घालताय. दिघीचा माणूस काळेवाडीला असतो. काळेवाडीचा माणूस दिघीला असतो. जाणूनबुजून कर्मचा-यांना त्रास का देताय? ही गंभीर बाब आहे. या कर्मचा-यांनाच्या जीवावर हा अधिकारी त्या जागेवर बसला आहे. कर्मचा-यांना वरिष्ठ अधिकारी त्रास देत असेल तर याची सुद्धा नोंद घेण्यात यावी. के.बी. गावडे यांची खातेनिहाय चौकशी पूर्ण होण्याअगोदरच त्यांना कामावर का घेतले या प्रश्नाचे उत्तर दिले आहे – श्री. के.बी. गावडे, अग्निशामक अधिकारी यांनी खातेनिहाय चौकशी सुरु ठेवून सेवानिलंबित रद्द करणेबाबत दि.२५/२/२००५ चे पत्रान्वये विनंती केली होती. आयुक्त साहेब, आपण कायदेतज्ञ आहात, कायदे पंडित आहात. आपण कायद्याचा खूप अभ्यास केला आहे. आम्ही कोणताही प्रश्न मांडला की, तुम्ही कायद्यावर बोट ठेवता. खातेनिहाय चौकशी सुरु ठेवून त्यांचे निलंबन रद्द करण्याबाबत त्यांनी तुम्हाला विनंती केली होती. त्यानुसार महाराष्ट्र नागरीसेवा (शिस्त व अपिल) नियम ४ (५) (क) नुसार दि.५/३/२००५ चे आदेशान्वये त्यांची खातेनिहाय चौकशीची कार्यवाही कार्यान्वयीत ठेवून त्यांचे निलंबन रद्द करण्यात आले आहे. याचा खुलासा आपण व्यवस्थित पद्धतीने दिला तर बरे होईल. जर एखाद्या ठेकेदाराने महापालिकेचा ठेका घेतल्यावर चुकीचे काम केलेतर तुम्ही ठेकेदाराला न्याय देता का? मग या माणसाला का न्याय देताय? के.बी. गावडे यांना कोणत्या माध्यमातून सेवेत रुजू करुन घेतले आहे याची सविस्तर माहिती द्यावी. एखाद्या अधिका-यांना महापालिकेचे रु.१०,४०,०००/- चे नुकसान केले आहे, त्याच्यावर ठपका ठेवला आहे. त्यावेळी कमिटी नेमली होती. त्याची प्रत माझ्याकडे आहे. कमिटी नेमत असताना अधिका-यांनी ज्या चूका केल्या आहेत, त्यांची चौकशी २००५ पासून २०१३ पर्यंत चालू आहे. चौकशीतून काय काय आढळले याची माहिती मिळाली नाही. चौकशी चालू असतानाही हा अधिकारी त्याच्या जागेवर आहे. या अधिका-याला पुन्हा तिथे ठेवायचे कारण काय याचे सविस्तर उत्तर द्यावे. त्यांच्याकडून नुकसानभरपाई न घेता कोणत्या नियमानुसार त्यांना कामावर रुजू केले आहे? या प्रश्नाचे उत्तरात म्हटले आहे, चुकिचे उपकरण

पुरविलेबाबत पुरवठाधारक कंपनीवर कायदेशीर कारवाई करण्याची नोटीस दिल्यानुसार या कंपनीने सर्व चुकिची उपकरणे बदलून दिली आहेत व त्या नव्याने आलेली उपकरणे अग्निशामक विभागाचे स्पेसिफिकेशन प्रमाणे योग्य असल्याचे अभिप्राय मुख्य अग्निशामक अधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी दि.३०/९/०६ चे पत्राने दिले आहेत. चुकीची उपकरणे संबंधित कंपनीने बदलून दिल्याने संबंधित दोषी अधिका-याकडून नुकसानाची रक्कम वसुल करण्याचे आदेश रद्द करण्याची शिफारस विभागप्रमुखांनी दिनांक १९/१०/२००६ अन्वये केलेनुसार उपकरणाच्या नुकसानीची र.रु.१०,४०,०००/- वसुल करण्याबाबतचे आदेश रद्द करुन उक्त अधिकारी/कर्मचारी श्री.के.बी. गावडे, अग्निशामक अधिकारी व इतर श्री.बि.एम.पवार, सब ऑफिसर व श्री. उदय माधवराव वानखेडे सब ऑफिसर व श्री. मच्छिंद्र सदाशिव पवार, सहा.भांडारपाल यांच्या दोन वेतनवाढी भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करुन स्थगित करण्यात आलेल्या आहेत असे उत्तर दिले आहे. असे उपकरण बदलायचे ठरले होते त्यावेळी निविदा काय होती. टेंडर प्रोसेस काय होती. त्यात नियम अटी काय होत्या. नियमांत असे होते का. आधी चुकीची वस्तू द्यायची, नंतर आरोप केलावर ती बदलून द्यायची असा कारभार करता येतो का. असे असेल तर या पाठिमागे असेच झाले आहे का. उपकरण सरळ सरळ बदलून दिले आहे. शिड्या बदलून दिल्या असतील तर त्याचे रेकॉर्ड दाखवतो. शिडी उचलायला किती लोक लागतात. ही शिडी उचलून दाखवा, एवढी गंभीर बाब आहे. यात सरळ सरळ उत्तर दिले आहे, उपकरण बदलून दिले म्हणून आम्ही त्यांना कामावर ठेवले आहे. अशी किती लोकांना तुम्ही निलंबित केले आहे, त्यांच्या कामात बदल करून त्यांना सुद्धा पुन्हा कामावर घ्या. त्यांनी चुकीचे काम केले असेल तरी हा चांगला व तो चुकीचा असे आहे का? तुमच्या काळात जे अधिकारी निलंबित झाले आहेत, त्यांनी महापालिकेचा फायदा करायचा प्रयत्न केला होता. त्यांना सुद्धा परत घ्या. श्री.गावडे यांच्याबाबत शंभर टक्के चुकीचे झाले आहे. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. तुम्ही उत्तरात सांगितले, या–या कर्मचा-यांच्या वेतनवाढी स्थगित करुन त्यांना कामावर घेतले आहे. त्यांच्या १/२ वेतनवाढी रोखल्या होत्या. यांना वेतन दिले नाहीतरी चालेल. यांना पगाराची काय गरज आहे. बिल्डींग परमिशन देताना एनओसी देताना बिल्डरकडून २/३ लाख घेतात. यांचे तंत्र, धंदा आहे. हा अधिकारी रात्री ७ पासून १० वाजेपर्यंत युनिटमध्ये कशाला बसलेला असतो. याच बिल्डरसाठी बसलेला असतो. सर्वसामान्य कार्यकर्ता गेलातर कधीच सपोर्ट करत नाहीत. बिल्डर गेला, इंजिनिअर गेलातर विचारतो, किती पैसे आणले आहेत. ही सद्यपरिस्थिती आहे. असे करत असतील तर यांना पगाराची गरज नाही. त्यांना काही फरक पडणार नाही असे मलातरी वाटते. आमच्या व्यापा-यांना, कार्यकर्त्यांना दिवाळीच्या वेळी फाटक्याचा स्टॉल उभा करायची असेल तर एनओसी देण्यासाठी एक हजार पासून पंचवीस हजारपर्यंत लाच घेतात. त्यांना सांगतात, एक लाख माल आणा. मी हे

जाणिवपूर्वक बोलतोय. बिल्डींग परमिशन विभागात सुद्धा लाच घेतात. आजपर्यंत त्यांच्यावर कोणीही डायरेक्ट आरोप केले नसतील. मी पुरावा देईल. त्याने नगरसेवकाकडून सुद्धा पैसे घेतले आहेत. महापालिकेची एनओसी लागत होती तर त्यासाठी पैसे घेतले आहेत. थोडीशी गाडी चुकीची लागलीतरी पोलिस पावती फाडतात. हजार रुपयाची सुद्धा पावती फाडतो. आम्ही हजार हजार रुपये देतो. यांना या कामासाठी ठेवायचा उद्देश काय त्याचे कारण सांगावे. पिंपरी चिंचवड मनपा हद्दीबाहेर अग्निशामक विभागाने इमारत बांधकाम प्लॅन मंजूर तात्पुरता ना हरकत दाखला व पक्का ना हरकत दाखला किती ठिकाणी दिला आहे असा मी प्रश्न विचारला होता. त्यात ५ गावांची ठिकाणे व पत्ते दिलेले आहेत. याचा नियम सांगितला तर बरे होईल. मनपा हद्दीबाहेर परमिशन देताना, अग्निशामक बंब हद्दीबाहेर देण्यासाठी त्याच्या अटी शर्ती काय आहेत, किती कि.मी. बाहेर देऊ शकतो हे सांगावे. संबंधित अधिका-यांना विचारा. कदाचित माझे अज्ञान असेल, बिल्डींग परमिशन देताना हद्दीबाहेर १० कि.मी. बाहेर देता येत नाही. यात धडधडीत लिहिले आहे. १० कि.मी. च्या बाहेर जाता येत नाही. यांनी कुठेकुठे परमिशन दिलेली आहे. आंबेगाव, वडगाव मावळ, माळवाडी मावळ, गहूंजे, सोमाटणे, म्हाळुंगे खेड, खराबवाडी खेड, वडाचीवाडी खेड, मामुर्डी, टाकवे ता.मावळ, चोविसावाडी, सोमाटणे फाटा, टाकवे खुर्द, तुंगी मावळ वराळे, लोणावळा. तुंगी मावळ मावळचे टोक आहे. पिं.चिं. मनपापासून ७० ते ८० कि.मी. पर्यंत आहे. अशा बांधकाम एनओसी देताना याच्या पाठिमागे खूप मोठे काळेबेरे आहे. याचे कारण काय याचे उत्तर द्यावे. यात खालच्या खुर्चीपासून ब-याच जणांचे लागेबांधे आहेत असे वाटत होते. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून हा सगळा गैरप्रकार बाहेर आणायचा प्रयत्न मी केला आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, आपण अग्निशामक विभागाला संवेदनशील विभाग मानतो. अतिदक्षता विभाग या दृष्टीने आपण या विभागाकडे पाहतो. या विभागाची ही स्थिती असेल, त्याचा केवळ धंदाच केला जात असेल, याकडे लक्ष दिले नाही. लक्ष दिले असले तरी चुकून कानाडोळा करता का काय असेही मला वाटते. एवढा मोठा प्रकार समोर असताना आरोग्य खात्यापासून प्रत्येक विभागात तुम्ही लक्ष घातले आहे. हेच तुमच्या नजरेतून बाजूला का झाले. मला वाटते तुम्हाला काही वेगळी कामे असल्यामुळे लक्ष देता आले नाही काय. सध्या अनधिकृत बांधकामात खूप गुंग आहात. मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले, वॉर्डातली कामे होत नाहीत. २ वर्षे झाली. मा.महापौर साहेब, आपण दोन आयुक्तांची मागणी करा. एक आयुक्त विभागात काम करण्यासाठी व एक आयुक्त अनधिकृत बांधकामासाठी देऊन टाकू. मा.मुख्यमंत्र्यांना अशी विनंती करु की, आम्हाला बाकी कामांसाठी एक आयुक्त द्यावा. हा विषय गंभीर असताना मी सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती करतो की, एकतर हा अधिकारी सस्पेण्ड व्हावा, याची खातेनिहाय चौकशी व्हावी. श्री.गावडे, श्री.वानखेडे हे अधिकारी सस्पेण्ड झाल्याशिवाय इथून पुढील सभा चालू देणार नाही अशी

मनापासून, कळकळीची विनंती करतो. जीवनमरणाचा विषय आहे. हा महत्वाचा विषय आहे. या विषयाची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच या अधिका-यांची खातेनिहाय चौकशी न करता आजच ऑर्डर द्यावी.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला या प्रश्नाला लागून एक प्रश्न विचारायचा आहे. अग्निशामक विभागासारखा इतका महत्वाचा विभाग आहे. या विभागाचे गांभिर्य, त्याची जाणिव सर्व अधिका-यांना असताना सुध्दा त्याठिकाणी क्लास ३चा अधिकारी श्री.किरण गावडे याच्याबद्दल ऊहापोह, चर्चा चालू आहे. १० वर्षांपूर्वी झालेले प्रकरण काढले आहे. मा.महापौर साहेब, कधीचे, काय घ्यावे हा तुमचा अधिकार आहे. तुम्ही हा अधिकार वापरून प्रशासनाला अनुमती द्यावी. जेणेकरुन सभागृहाचा वेळ वाचू शकतो. क्लास ३चा अधिकारी असताना त्यांना क्लास १ च्या अधिका-याप्रमाणे अधिकार आहेत का. अग्निशामक हा एवढा महत्वाचा विभाग असताना, जर शहरात एखादी दूर्घटना घडली तर त्याचे सर्व ताशेरे तुमच्यावर फोडले जाणार आहे. पिंपरी चिंचवड सारख्या महापालिकेत इतके मोठमोठे उद्योग आहेत. या परिसरात झपाट्याने शहरीकरण विकास, नागरीकरण झाले आहे. दरम्यान मुंबईत मंत्र्यालयात आग लागली होती, कलकत्तामध्ये आग लागण्याची घटना घडली, याचा विचार करता याठिकाणी क्लास एक किंवा दोनचा अधिकारी या विभागात असावा. त्याचे नियंत्रण व्यवस्थित असावे. ज्या श्री.किरण गावडे यांच्यासंदर्भात चर्चा चालू आहे. हा क्लास ३ चा अधिकारी आहे. त्यांना क्लास २ चा सुध्दा दर्जा दिलेला नाही. मा.आयुक्त साहेब, आपल्याकडून याचा सुध्दा खुलासा व्हावा. १०/१५ कोटींचा व्यवहार, इतकी मोठी जबाबदारी देताना त्यावेळी कलम ७४ नुसार उत्तर दिले गेले आहे. शासनाच्या जी.आर. आहे त्याप्रमाणे, आदेशाप्रमाणे शहराच्या हद्दीच्या १० कि.मी. अंतरापर्यंत अशा प्रकारची यंत्रणा पुरवायची आहे. उत्तर देताना त्यात स्पष्टता असावी. आयुक्त साहेबांनी इतक्या महत्वाच्या प्रश्नाचे कसे उत्तर दिले पाहीजे. यासंदर्भात इतक्या मोठ्या जबाबदारीच्या पदावर क्लास १ किंवा क्लास २ चा अधिकारी का नाही याचे आयुक्त साहेबांनी उत्तर द्यावे. काय नियोजन केले आहे. काही वाईट घटना घडलीतर क्लास ३ च्या माणसावर जबाबदारी सोपवली म्हणून हे घडले असे उत्तर देणार आहात का याचा सुध्दा खुलासा द्यावा.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी सन्मा. सदस्या अश्विनी चिंचवडे यांच्या प्रश्नांना उत्तर देताना आपण सन्मा.कायदा सल्लागार यांचे मत मागवले आहे. त्यांनी सांगितले, सारंग कामतेकर हे हायकोर्टात असल्यामुळे या विषयावर आपल्याला बोलता येणार नाही. सभागृहाच्या निदर्शनास आणू देते की, ज्या अडीच एफएसआय संदर्भात

हायकोर्टाने आपला एक एफएसआय बांधकाम सोडून बाकी बांधकाम अवैध ठरवले आहे. सुदैवाने म्हणा किंवा दूर्दैवाने आजच यावर सुनावणी झाली आहे. प्राधिकरण व पिंपरी चिंचवड महापालिका या दोन संस्थांसाठी वेगवेगळे नियम लागू आहेत का. एकिकडे हायकोर्ट सांगते, सुनावणी घ्या. म्हणून प्राधिकरण सुनावणी घेते. दुसरीकडे सर्वसामान्य व्यक्ती निवडून येऊन नगरसेवक म्हणून बसले आहेत. एकिकडे प्राधिकरणात सुनावणी घ्यायची, दुसरीकडे मात्र या सभागृहात चर्चा होऊ नये, प्रशासनाची बदनामी होईल म्हणून चर्चा थांबवायची हे योग्य नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, याठिकाणी श्री.सतिश पवार, अति.कायदा सल्लागार यांनी उत्तर दिले आहे. त्यांची शैक्षणिक अर्हता काय, पात्रता काय. खरेतर त्यांचा कायद्याबाबतीत अभ्यास असेल तर त्यांनी असे बेजबाबदारपणे उत्तर देणे योग्य आहे का? असे उत्तर दिले असेलतर ही सभागृहाची दिशाभूल नाही का? त्यांनी सांगितले, चर्चा करता येत नाही. चर्चा करत येत नाहीतर आज त्याच विषयावर प्राधिकरणामध्ये माझी सुनावणी झाली आहे. खरेतर विषय असा आहे, त्यात प्रशासनाने ज्या १४ बिल्डींगज् अनधिकृतपणे बांधल्या आहेत, त्या पाडाव्या लागतील. हे उघडकीस येऊ नये म्हणून इथे कायद्याचा बडगा उगारला जातो आहे. मी मघाशी विनंती केली होती मला बोलू द्या. मा.अश्विनी चिंचवडे असतील, मा.दत्ता साने असतील या सन्मा. सदस्यांनी जे प्रश्न विचारले, सभा कामकाजाचा भाग म्हणून, सन्मा. सदस्य म्हणून त्यांना त्यांचे मत मांडायचा निश्चितपणे अधिकार आहे असे मला वाटते. मा.अश्विनी चिंचवडे यांनी जेवढे प्रश्न विचारले पण त्यांच्या एकाही प्रश्नाचे उत्तर नीट दिले नाही. पूर्ण गोलमाल केलेली उत्तरे आहेत. बांधकाम परवानगी न घेता ज्यांनी बांधकाम केले आहे त्यांना नोटीस बजावली का या प्रश्नाचे उत्तर नाही असे सांगताय. जे खरे आहे ते सांगायचे नाही. पण खरेतर मैलाशुद्धीकरणाची पाईपलाईन टाकली नाही म्हणून घरे द्यायला वेळ लागतो आहे असे सांगताय. मिलिंद नगर, अजंठा नगर, विठ्ठल नगर इथले प्रोजेक्ट हायकोर्टात नाहीत. सेक्टर २२ वगळता आपल्याला कुठेही स्टे मिळालेला नाही. त्यामुळे या विषयावर चर्चा करता येत नाही या मताशी मी सहमत नाही. याठिकाणी आपण मिलिंद नगर असेल, अजंठा नगर असेल एसआरएसाठी तिथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला परमिशन घेतली नाही. एमपीसीबीने आपली १० लाखाची एफ.डी. जप्त केली. ही आपली जबाबदारी नाही का. ज्या अधिका-यांवर जबाबदारी सोपविली त्यांचे कर्तव्य नाही का. त्यांच्यावर काय कारवाई केली. प्रशासनाने याचे उत्तर देणे अपेक्षित होते. ही उत्तरे दिली गेली नाहीत. आयुक्त साहेबांबद्दल आमचे मत खूप चांगले आहे. निश्चित यापुढेही असणार आहे. कारण आपण चुकीचे काही करत नाही. परंतू जर प्रशासन अशा प्रकारची लपवाछपवी करत असेल तर, हे प्रकल्प आपल्या काळात झालेले असोत किंवा नसोत, त्यात सुधारणा काय करणार हे देखील सांगणे तितकेच महत्वाचे आहे. प्रशासनाने सगळ्या गोष्टीत लपविण्यासारखे काही नाही. परंतू सगळ्यात महत्वाचा भाग हा असतो की,

काही झालेतरी ते झालेच नाही, घडलेच नाही असे दाखवण्यात आपण आपली शक्ती खर्च करतो. आयुक्त साहेब, आत्ता मा.दत्ता साने यांनी जे-जे प्रश्न विचारले आहेत, त्यानुसार शहराच्या हद्दीपासून १० कि.मी. अंतरापर्यंत ज्या-ज्या ठिकाणी बिल्डींग परमिशनसाठी अग्निशामक विभागाने एनओसी दिलेल्या आहेत, त्या सगळ्या एनओसींची चौकशी करण्यात यावी. मा.योगेश बहल यांनी अग्निशामक विभागातील अधिका-यांबद्दल जसे सांगितले की, शासनाचा जी.आर. आहे, आदेश आहेत. निश्चितपणे असे देऊ शकतो, आंबेठाण असेल, लोणावळा असेल, आपण पनवेल पर्यंत एनओसी दिलेल्या आहेत. याची चौकशी केली पाहीजे. संबंधित अधिका-याला निलंबित केले पाहीजे. त्यांचे सवंगडी आहेत त्यांचे सुद्धा निलंबन झाले पाहीजे. आपल्याकडे रिफ्युज एरिया दाखवतात. ७व्या मजल्यावर रिफ्युज एरिया ठेवतो तर त्याची ऊंची २.४० मी. असली पाहीजे. परंतू तसे नसताना २.७५ मी. किंवा २.८० मी. असते. हा भाग फ्लॅटमध्ये कन्व्हर्ट करतात. एनओसी देताना हे बघण्याची जबाबदारी ही अग्निशामक विभागाची असते. माझी विनंती आहे, ज्या-ज्या ठिकाणी बांधकाम परवानगी देताना रिफ्युज एरिया दाखवला असेल आणि तो तिथे नाही. त्या सगळ्याचे ऑडीट करा. फायरची स्पेशल शिडी द्यावी लागते. ती आहे का हे त्याठिकाणी बघा. एखाद्या ठिकाणी आग लागली, वेळ गेली की आख्खे डिपार्टमेंट कामाला लागते. नगरसेवकांचे मोर्चे निघतात. खुलासा देत बसतो. वेळ निघून गेलेली असते. मला याठिकाणी श्री.किरण गावडे, अग्निशामक अधिकारी यांना खरेतर मला दोषी धरायचे आहे. रिफ्युज एरिया बाबत गेले ४ वर्षांपासून मी मागणी करतेय, याचे स्पेशल ऑडीट झाले पाहिजे. आज या रिफ्युज एरियाची परिस्थिती काय? हा एरिया फ्लॅटमध्ये कन्व्हर्ट झाला असेलतर दिलेल्या एनओसीचे काय? आज शंभर टक्के व्यवहार झाल्याशिवाय तिथे एनओसी मिळत नाही. बिल्डर छोटा असू दे, मोठा असू दे. संध्याकाळी ७.०० नंतर रांग लागलेली असते. गावाच्या एका कोप-यात हा विभाग आहे. सहजासहजी लक्ष जाणार नाही अशा ठिकाणी हा विभाग तिथे ठेवलेला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आम्ही जे काही प्रश्न सभागृहात विचारतो, त्यांची उत्तरे सभागृहामध्ये बरोबर देणे अपेक्षित असताना सुद्धा प्रशासनाकडून चुकीची उत्तरे दिली जातात. त्याबद्दल आयुक्त म्हणून आपण खरेतर दिलगीरी व्यक्त केली पाहीजे.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी मा.अश्विनी चिंचवडे यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर झालेली चर्चा याकडे न जाता तुम्ही म्हणालात हा विषय झालेला आहे. परंतू वेगळ्या प्रकारची भिती, आणि वेगळ्या प्रकारची चर्चा याठिकाणी घडते आहे. ख-या अर्थाने सर्वसामान्यांचे प्रश्न कोर्टात अडकले आहेत. त्यावर काय मार्ग निघाला पाहिजे, यासाठी काय प्रयत्न केले पाहीजेत यासाठी कधीतरी सगळ्या नगरसेवकांना एकत्र बोलवावे. प्रत्येकाची

इच्छा आहे, हे अडकलेले प्रोजेक्ट लवकरात लवकर पूर्ण व्हावेत. मा.उल्हास शेट्टी यांच्या भागातील प्रोजेक्ट असेल, माझ्या भागातील प्रोजेक्ट असेल, वेताळनगर, विठ्ठलनगर, मिलिंदनगर असेल हे प्रोजेक्ट कोणत्या कारणांमुळे अडकले आहेत हे सुद्धा जनतेपुढे आले पाहीजे. हा जनतेचा विषय आहे. आम्हाला मते देणा-या लोकांचा विषय आहे. याची चर्चा इथे करत नाही. कारण आपण उत्तर द्यायला घाबरता. किंवा कोणाला घाबरता आम्हाला माहित नाही. यावर विस्तृत चर्चा होत नाही याचे काय कारणाने प्रोजेक्ट थांबवले याची चर्चा करता येत नसेलतर मा.महापौर साहेब, आपल्या अधिकारात यावर चर्चा घडवून यातून काय मार्ग निघेल हे पहावे. फक्त बोलणा-यांनी बोलायचे, साधणा-यांनी काय साधायचे ते साधायचे आणि गप्प बसणा-यांनी गप्प बसायचे हे थांबले पाहीजे. यावर काहीतरी निर्णय घ्यावा. किरण गावडे, अग्निशामक अधिकारी यांची खातेनिहाय चौकशी करण्याबाबत प्रश्न क्र. ३ अ) विचारला आहे, याबाबत सांगायचे आहे. सन्मा. नगरसेविका मा.शमिम पठाण या त्यावेळी स्थायी समिती अध्यक्ष होत्या, त्यादरम्यान या उपकरणांची खरेदी झाली आहे. त्यावेळी जुनी सदस्य मंडळी होती. त्यावेळी हा गडबड घोटाळा झाला आहे. हे आपल्या निदर्शनास आणून देण्यासाठी हा विषय इथे मांडला आहे. मा.योगेश बहल यांनी सांगितले, १०/१२ वर्षांपूर्वीचा प्रश्न आहे. हा विषय आत्ता आणायचे कारण काय. प्रत्येकाला आपल्याकडून अपेक्षा उंचावत चालल्या आहेच. वाईट गोष्टी पुढे आणायच्या, त्याचा निकाल लावायचा, चांगली कामे होतच नाही. दूदैवाने आपण चांगल्या कामासाठी वेळच देऊ शकत नाही. या पाठिमागे काय हेतू आहे हे तुम्हाला सुद्धा कळते व इथे बसलेल्या नगरसेवकांना सुद्धा कळते. पूर्वी महापालिका वतनावर चालत होती. काही वतने निर्माण झाली होती. उद्यान विभाग असेल, बारामतीचे साहेब आहेत त्यांना पाटिलकी दिली आहे. बिल्डींग परमिशन असेल. आपण काही पाटिलक्या मोडून काढल्या आहेत. वायसीएम असेल, क्रिडा विभाग असेल सर्व विभागांवर नियंत्रण आणले आहे. अग्निशामक विभागाकडे लक्ष न गेल्यामुळे मा.दत्ता साने यांनी हे प्रश्न उपस्थित केले आहेत. अतिशय चुकीची उत्तरे दिली आहेत. चुकीची उपकरणे पुरविल्याबाबत त्यांना सस्पेण्ड केले होते हे चुकीचे उत्तर आहे. ठेकेदाराने उपकरण बदलून दिले म्हणून निलंबन रद्द केले कोणत्या नियमात बसते. चोरी ही चोरीच आहे. पैसे भरेल म्हणून तो गुन्हा होत नाही हे म्हणणे अतिशय चुकीचे आहे. आपण हे केलेले नाही. आपण आजच याचे उत्तर सभागृहाला द्या. ही आपल्याला पटले आहे का. चुकीचे असेल तर अधिका-यावर कारवाई व्हायला पाहीजे. कोणाच्या दबावाखाली करण्यात आले आहे. रु.१०,४०,०००/- ही रक्कम म्हटलीतर लहान आहे, म्हटले तर सामान्य नागरीकासाठी वर्ष दोन वर्षांचे बजेट आहे. असा चुकीचा निर्णय घेतल्यावर १० वर्षांनी याला वाचा फोडावी लागते या गोष्टीचे कारण काही असलेतरी ती चूकच आहे. आपण यावर उत्तर देणार नसाल तर या सगळ्यात तुम्हीही सामिल आहात असे म्हणावे

लागेल. अग्निशामक विभागाचा हा अधिकारी क्लास १ / क्लास २ चा अधिकारी नसताना त्याच्यावर मोठी जबाबदारी दिली आहे. मी सभागृहाच्या वतीने सांगते, महापालिका कार्यक्षेत्रात नसेल, महापालिकेत अधिकारी उपलब्ध नसेल तर बाहेरून मागवावा. या विभागात शासनाचा सक्षम अधिकारी असावा अशी विनंती करते.

**मा.प्रशांत शिताळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर या प्रश्नाच्या निमित्ताने अनेक प्रश्नांचा ऊहापोह सभागृहात होतो आहे. खरेतर मा.अश्विनी चिंचवडे पाटील या नवीन सदस्या असून सुद्धा त्यांनी शहरातील अनेक गोष्टींबाबत चर्चा केलेली आपण पाहिली आहे. शहरातील नगरसेवक गेले १० वर्षांपासून मी व सर्वजण पाहतोय. कोणत्या गोष्टींमुळे फायदा झाला, कोणत्या गोष्टीमुळे शहराचे नाव ऊंचावले गेले, कोणत्या गोष्टीमुळे शहराची व्हॅल्यू वाढली गेली, कोणत्या गोष्टीमुळे शहर नावारुपास आले याचे साक्षीदार बरेच सदस्य आहेत. इथे कामे होत असताना त्यात अनेक चुका, त्रुटी झाल्या आहेत यात शंका नाही. परंतू आयुक्त म्हणून आपण इथे चार्ज घेतल्यानंतर चुकीच्या कामाला पायबंद बसावा, आळा बसावा अशी अपेक्षा साहजिकच आमच्यासारख्यांच्या मनात एक प्रतिनिधी म्हणून येणे चुकीचे नाही. परंतु हे करत असताना सगळेच चुकीचे होते आहे, गौडबंगाल आहे, कोणीतरी याच्या मागे आहे असे समजणे हे सुद्धा तितकेच चुकीचे आहे. असे होत असताना खरोखर ज्या चुकीच्या गोष्टी आहेत, त्या गोष्टींकडे जाणिवपूर्वक लक्ष देणे सुद्धा आम्ही अपेक्षित धरु इच्छितो. त्याप्रमाणे मा.दत्ता साने यांनी सांगितले, श्री.किरण गावडे यांच्याबाबत माहिती विचारली. मा.योगेश बहल यांनी सांगितले, वर्ग ३ चा अधिकारी असताना त्यांना अग्निशामक विभागाच्या प्रमुखपदाचा चार्ज का दिला. या पदावरील अधिकारी वर्ग १ चा असतो. तुमच्या गाडीवर असणारा पिवळा दिवा हा तुमच्याकडे अग्निशामक अधिकारी आहे म्हणून तुम्हाला वापरायला मिळतो आहे. ज्यावेळी शासनाचे पत्र आले होते, दिवे काढून घेतले जातील त्यावेळी त्यांनी सांगितले होते. कदाचित हे चुकीचे सुद्धा असू शकेल. पण प्रशासन प्रमुख म्हणून आयुक्त साहेब तुमच्याकडे पाहिले जाते आणि राजकीय लोकांचे प्रमुख म्हणून महापौर साहेब तुमच्याकडे पाहिले जाते. हे होत असताना शहरात बरीचशी चुकीची कामे चालतात. चांगली कामे होत नाहीत असा आमचा समज झाला आहे. पण आपण चुकीच्या कामांना आळा घालायचे काम करताय. मा.आर.एस.कुमार यांनी प्रश्न विचारले त्याला तुम्ही तुमच्या पद्धतीने उत्तर दिले आहे. कुठेतरी चुकीची कामे होत असतील तर त्याला पायबंद घातला पाहीजे. महापालिकेने निलंबित केलेला अधिकारी, ज्याच्यावर गंभीर गुन्ह्यासाठी परत उत्तर देताना म्हणताय, असा असा आरोप झाला म्हणून त्याला निलंबित केले होते. आम्हाला सुद्धा हे माहित असते. कायद्याला कुठेतरी पळवाट असते. म्हणून त्यांना कामावर घेतले गेले. किरण गावडे यांनी काही वर्षांपूर्वी सांगितले होते. पुणे महापालिका व

पिंपरी चिंचवड महापालिका या दोनही महापालिकांमध्ये शासनाकडे हद्दीबाबत हिंजवडी आपल्याकडे घेण्यात यावी यावरुन वाद चालू होता. इतर ग्रामिण भाग पुणे जिल्हा परिषदेकडे द्यावा. यासाठी भांडा म्हणून मी विनंती केली होती. हिंजवडीच्या सर्व एनओसी पुणे महापालिका देते. त्या भागात आपल्या लोकांचा असणारा मान, आपली त्यांच्याशी असणारी जवळीक बघितली तर हिंजवडी पिंपरी चिंचवड महापालिकेचा भाग होईल उद्याच्या काळात. प्रत्यक्ष १० कि.मी. मर्यादा असताना आपण महापालिका हद्दीपासून ८० कि.मी. पर्यंत एनओसी दिली आहे. मुंबईत मंत्रालयात आग लागल्यानंतर मी आपल्याला पत्र दिले होते. महापालिकेच्या अग्निशामक विभागात प्लॅन समजणारा तिथे एकही सक्षम अधिकारी नाही. बिल्डरचा आर्किटेक्ट त्यांच्याकडे जातो आणि त्यांना प्लॅन समजून सांगतो. नंतर हॉस्पिटल, कमर्शियल प्रोजेक्ट असेल तर त्यांना प्रोव्हिजनल एनओसी दिली जाते. प्लॅन काढायचे का नाही, कसा काढायचा हे जर त्यांना कळत नसेल तर महापालिकेतील कोणत्याही ड्रॉईंगवर फायरचे ड्राईंग दिले जात नाही. याची मागणी मी मागिल वर्षी केली होती. या गोष्टी अतिशय गांभीर्यपूर्वक घेतल्या पाहीजेत. दूर्घटना दूर्घटना असते. अपघात अपघात असतो. ते कधीतरी होत असतो. रोज होत नाही. म्हणून सूरक्षा घ्यायची नाही अशातला भाग नाही. अग्निशामकच्या गाड्या कधी उपयोगात येऊ नयेत म्हणजे कुठेही दूर्घटना घडू नये म्हणजे आपण त्यासाठी व्यवस्था ठेवू नये असे होत नाही. व्यवस्था चांगल्या पद्धतीने ठेवावी यासाठी नियम चांगले असावेत. ज्यांनी नियम तयार केले, तयार केलेले नियम बघणा-यांमध्ये ते नियम तपासायची अर्हता देखील असली पाहीजे. काहीतरी क्वालिफीकेशन पाहीजे. या सगळ्या गोष्टी फासाला टांगल्या आहेत. बिल्डींग परमिशन विभागामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे प्रपोजल येत असतात. अनेक ठिकाणी फायर विभागाची एनओसी लागते. तुम्हाला, सिटी इंजिनिअर यांना सांगितले होते. फायर इंजिनिअरिंग झाले आहे अशा व्यक्तीकडून स्पेशल ड्राईंग करुन घ्या. फायर ऑडिट करुन घ्या, असे शासनाने नुकतेच सांगितले आहे. कोणत्याही प्रकारची देखभाल, शहानिशा केली जात नाही. फाईलला टोकन नंबर टाकला जातो. आर्किटेक्टचा माणूस गावडेकडे जाऊन बसतो. असे असे होते. एक दिवसांत प्रोव्हिजनल एनओसी होते. असे होत असताना या विभागाकडे अनेक ठिकाणी दूर्लक्ष केले जाते. हा विभाग एका बाजूला आहे. अनेक गोष्टी बघण्यासारख्या, पाहण्यासारख्या आहेत. तुमच्याकडून जास्त अपेक्षा आहे. तुम्हीच नियंत्रण केले पाहीजे. चांगल्या पद्धतीच्या सुविधा असल्या पाहीजेत. शहरात वेगवेगळ्या ठिकाणी फायर सेंटर्स असली पाहीजेत. केवळ अधिका-यांना सस्पेण्ड करा असे नाही. अधिका-यांना चांगल्या पद्धतीने काम करायला शिस्त लावताय. मात्र हि शिस्त इथे दिसत नाही. त्यासाठी प्रयत्न करावा.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सन्मा. सदस्य दत्ता साने यांनी जो विषय उपस्थित केला, तो विषय अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे आहे. प्रश्न विचारताना सातत्याने आयुक्त पाठिशी घालतात, असा रोख आल्यामुळे म्हणले होते म्हणून मी उत्तर देतोय. नाहीतर या विषयाचे अतिरिक्त आयुक्त यांनी उत्तर देणे अपेक्षित आहे. ही घटना २००० साली घडली. १३ वर्षांपूर्वी झालेल्या घटनेबाबत प्रश्न उपस्थित झाला याचे आश्चर्य वाटते. याबाबत उल्लेख आला या पदासाठी आयुक्तांनी यांना का बसवले असा प्रश्न विचारण्यात आला. ते याआधीपासून त्या पदावर आहेत. अग्निशामक अधिकारी या पदासाठी त्यापेक्षा अधिक वरिष्ठ कोणी वर्ग २ चा अधिकारी उपलब्ध असता तर त्याठिकाणी बदलून निश्चितपणे देण्यात आला असता. माझ्या कालावधीत कोणतीही गौरव किंवा पदोन्नती केलेली नाही. मी कोणाला पाठिशी घालतो या मताशी मी सहमत नाही. कर्मचा-यांना ओव्हरटाईम देण्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. ही प्रशासकीय बाब आहे. माझ्या गेले १ वर्ष, ५ महिने, २७ दिवसांच्या कालावधीत या विभागातील एकही व्यक्ती माझ्याकडे अतिकालिन भत्ता मिळाला नाही म्हणून आलेला नाही. कदाचित कुठला ओव्हरटाईम द्यायचे प्रलंबित असेलतर अतिरिक्त आयुक्त यांनी त्वरित दखल घेऊन पाठपुरावा करुन मार्गी लावण्यात यावेत अशी अति.आयुक्त यांना सूचना करतो. किरण गावडे यांचे सेवानिलंबन करुन पुन्हा ते रद्द करण्यात आले. या मुद्याचे मी उत्तर देतो की, दि.५/३/२००५ रोजी सेवा निलंबन रद्द करुन त्यांना कामावर घेण्याचे आदेश तत्कालिन आयुक्त यांनी पारित केला आहे. हे आदेश देण्यात आला ही ८ वर्षे ८ महिने १५ दिवसांपूर्वीची घटना आहे. मी रुजू होण्यापूर्वी श्री.किरण गावडे सेवेत पुन्हा रूजू झाले ही घटना ७ वर्षे २ महिने १७ दिवसांपूर्वीची होती. आयुक्तांनी आदेश बदलला असा सन्मा. सदस्यांनी मुद्दा मांडला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, तत्कालिन आयुक्त यांनी त्यांच्या अधिकारांत घेतलेला हा निर्णय आहे. मुं.प्रा.मनपा अधिनियमामध्ये व सर्वसाधारण प्रचलित बाब आहे, जो निर्णय तत्कालिन आयुक्तांनी त्यांच्या अधिकार कक्षेत घेतला असेल तर नंतर येणारा अधिकारी सर्वसाधारणपणे हा निर्णय बदलत नाही. वरिष्ठ पातळीवरुन निर्णय बदलला जातो. आयुक्तांनी दि. २१/११/२००० रोजी म्हटले होते, त्यांनी उपकरणे बदलून दिली, त्यासाठी नुकसान रक्कम रु.१०,४०,०००/- वसूल करण्याचे आदेश रद्द करुन श्री.गावडे, श्री.वानखेडे, श्री.मच्छिंद्र पवार यांच्या दोन वेतनवाढींवर परिणाम करुन स्थगित करण्याचे आदेश देण्यात आले. त्यांच्या वेतनवाढी थांबवल्या होत्या, मात्र वसुलीचा आदेश रद्द केलेला आहे. ही देखील ७ वर्षांपूर्वीची घटना आहे. म्हणजे मी रुजू होण्याआधी ५ वर्षे, ६ महिने व ३ दिवसांपूर्वीची घटना आहे. अर्थात माझा याच्याशी काहीही संबंध नाही. माझ्या कारकीर्दीत असे घडले तर निश्चित त्याची दखल घेऊन चौकशी करुन जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. याठिकाणी

लाच घेण्याचा मुद्दा उपस्थित झाला. दुर्दैवाने लाच घेणे, लाच देणे ही अतिशय दूर्देवी बाब आहे. ही बाब वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांमध्ये आढळून येते. दुर्दैवाने पिंपरी चिंचवड महापालिकाही त्याला अपवाद नसेल. याबाबत काही असेल तर लाचलुचपत प्रतिबंधक कायदा आहे. कृपया संबंधित पोलिस अधिका-यांकडे तक्रार नोंदवावी. ट्रॅप झालेतर मी ताबडतोब निलंबन करुन पुढील कारवाई करायला तयार आहे. याव्यतिरिक्त पुरावे दिले तर मी चौकशी करेन. चौकशीत कोणी दोषी आढळल्यास मग तो कर्मचारी वर्ग एकचा असो किंवा चारचा असो कोणालाही पाठीशी घालायचे काहीही कारण नाही. सन्मा.सदस्य महेश लांडगे यांच्याबाबतीत एक विषय आला. एनओसी मागण्यासाठी लाच मागीतली अशी तक्रार केली होती. चौकशीचा अहवाल माझ्याकडे आहे. **NOCI** मार्फत हे प्रकरण दाखल करण्यासाठी सांगण्यात आले होते. त्यांची फि रु.१५१०/- आहे म्हणून तसे हे पैसे त्यांना भरायला सांगितले होते. त्याचे स्पष्टीकरण योग्य पद्धतीने दिले गेले नसल्यामुळे गैरसमज निर्माण झाला आहे. महापालिकेच्या कोणत्याही प्रकरणात अशी एनओसी घ्यावी लागू नये म्हणून दि.२७/९/१३ रोजी सीएफसी कडून सर्क्युलर काढण्यात आले आहे. त्रुटी दूर करण्यात आली. महापालिकेच्या कोणत्याही प्रकरणात एनओसी घ्यावी लागू नये किंवा पैसे भरावे लागू नये. महापालिका कार्यक्षेत्राबाहेरील ज्या गावांमध्ये एनओसी दिलेली आहे. त्यात महाराष्ट्र शासनाचे आदेश आहेत. याठिकाणी मी हे सांगू इच्छितो की, राज्य शासनाचे मा.प्रधान सचिव यांनी दि.२१/११/२००९ रोजी पुणे महापालिका व पिंपरी चिंचवड महापालिका यांच्या हद्दीबाहेरील १० कि.मी. परिसरात विशेष नियमावली लागू करण्याबाबत बैठक घेतली होती. त्यानंतर जानेवारी २०१० रोजी मा.प्रधान सचिव, नगरविकास यांनी बैठक घेतली होती, त्याचे कार्यवृत्त आपल्याला दिले आहे. त्याअनुषंगाने दि. १५ फेब्रुवारी २०१० रोजी झालेल्या मा.महापालिका सभेमध्ये ठराव केला होता की, महापालिका हद्दीपासून १० कि.मी. परिसरात नव्याने बांधण्यात येणा-या इमारतींना अग्निशामक विभागाकडून एनओसी देणेकामी प्रस्तावात नमुदप्रमाणे शुल्क आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार तत्कालिन आयुक्त यांनी दि.६ मार्च २०१० रोजी याची अंमलबजावणीस सुरुवात केली आहे. महापालिकेच्या १० कि.मी. कार्यक्षेत्रात ७६ गावे येतात. महापालिकेच्या हद्दीपासून खेड तालुक्यातली ४२ गावे आहे, मावळ तालुक्यातली ३४ गावे आहेत. ही शहराच्या लगतची गावे आहेत. याठिकाणी रिजनल प्लॅन चालू आहे, असे बहुतांशी दिसून येते की, मोठ्या शहराच्या हद्दीलगतच्या गावांमध्ये अनियंत्रित स्वरुपात वाढ होते. तिथे टाऊन प्लॅनिंगचे नियम वापरले जात नाहीत. पुणे परिसरात धनकवडीमध्ये असे आढळून आले आहे. अशा ठिकाणी एखादी आपत्ती झालीतर अनेक अडचणी उद्भवतात म्हणून रिजनल प्लॅनमध्ये त्याची दखल घेतली जाते. म्हणून ग्रामपंचायतीत किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात फायरचा दाखला देण्यासाठी सक्षम अधिकारी नसल्यामुळे आपल्याकडे ही जबाबदारी दिली

होती. हिंजवडीचा उल्लेख इथे केला गेला. राज्य शासनाने ही जबाबदारी वाटून दिली आहे. त्यात खेड, मावळसाठी पिंपरी चिंचवड महापालिका व हवेली, मुळशी,शिरुर, भोर, पुरंदरसाठी पुणे महापालिका अशी जबाबदारी वाटून दिली आहे. मुख्य अग्निशामक अधिकारी यांच्याकडे विकसकाने विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. असे शासनाचे निर्देश असल्यामुळे आपली मर्यादा खेड, मावळ तालुक्याच्या ७६ गावांपर्यंत एनओसी देण्याची जबाबदारी आपल्यावर सोपविली आहे. सर्व एनओसींची अतिरिक्त आयुक्तांमार्फत तपासणी करुन घेऊ. तरीदेखील बहुतांशी एनओसी १० कि.मी. हद्दीपर्यंत दिल्याचे दिसते. मा.महापौर साहेब परवानगी देत असतील तर शासनाने निश्चित केलेल्या ७६ गावांची नावे वाचून दाखवायला मी तयार आहे.

**मा.सिमा सावळे –** मा.आयुक्त साहेब, आपल्या शहराच्या हद्दीपासून का त्या शहरापासून १० कि.मी. अंतरापर्यंत आहे.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – आपल्या शहराच्या हद्दीपासून १० कि.मी. अंतरापर्यंत आहे.

**मा.सिमा सावळे –** मा.आयुक्त साहेब, मी याला चॅलेंज करते. आपण मीटर लावू. खेड, मावळपर्यंत किती कि.मी. होतात ते पाहू. आंबेठाण १० कि.मी. पर्यंत आहे का.

(मा.महापालिका आयुक्त यांनी ७६ गावांची नावे वाचून दाखवली.)

**मा.दत्ता साने –** मा.आयुक्त साहेब, तुम्ही आत्ता खेड तालुक्यातील गावांची नावे वाचून दाखवली. त्यात १३५ क्रमांकाचे गावाचे नाव मंचर आहे. ते खेड तालुक्यात कुठे आहे ते सांगा.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – मी या आधीच सांगितले आहे, अति.आयुक्तांकडून याची तपासणी करणार आहोत. माझ्या माहितीप्रमाणे ६० ते ७० टक्के गावे या यादीत दिसतात. या यादीबाहेरील गावे असतील त्याची तपासणी करुन योग्य ती कारवाई करायला आम्ही तयार आहोत.

**मा.दत्ता साने –** मा.आयुक्त साहेब, आपले १० कि.मी. कुठून कुठपर्यंत असणार आहेत ते सांगा.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – आपली हद्द जिथपर्यंत आहे. जसे इंद्रायणी नदी पलिकडे १० कि.मी. पर्यंत.

**मा.दत्ता साने –** मा.आयुक्त साहेब, १७४ गावांची यादी आहे. यात ठराविक गावे सोडलीतर १००/१५० गावे १० कि.मी. हद्दीबाहेरील आहेत. १७७ क्रमांकाचे मंचर, ता.आंबेगाव असे लिहीले आहे. मंचर कुठे आहे ते सांगा. आंबेगाव तालुका कुठे आहे ते सांगा.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – मा.महापौर साहेब, प्रत्येक गावाबाबत चर्चा करायची म्हटलेतर सभेचा पूर्ण वेळ जाईल. बहुतांशी गावे यात दिसतात. जी गावे दिसत नाहीत त्याची चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**मा.दत्ता साने –** मा.आयुक्त साहेब, विषयाला कलाटणी देऊ नका. या गावांना एनओसी देताना खूप मोठा आर्थिक घबला झाला आहे हे सांगायचा मी प्रयत्न करतोय. मंचर, तुंगी, लोणावळा हे कुठे आहेत याबाबत तरी सांगा.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – आपली परवानगी असेल तर १३२ नावे वाचू का. पुढील मिटींगमध्ये अतिरिक्त आयुक्त यांनी गावांची नावे वाचावीत, ते सांगतील.

**मा.महापौर –** सर्वांकडे गावांची यादी आहे, ती कशाला वाचून दाखवायची आहे.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – मा.महापौर साहेब, मी उत्तर दिले आहे, बहुतांशी गावे ७६ गावांपैकी दिसतात. जी दिसत नाहीत त्यांची चौकशी अतिरिक्त आयुक्त करतील. त्यांचा अहवाल आल्यानंतर आम्ही योग्य ती कारवाई करु. मा.योगेश बहल यांनी जो मुद्दा उपस्थित केला. आपल्याकडे लोकसंख्या आहे, कार्यक्षेत्र आहे हे लक्षात घेता त्या पदावर जबाबदार अधिकारी असणे आवश्यक आहे या मताशी मी पूर्णतः सहमत आहे. याबाबतीत नुकतेच राज्य शासनाने अग्निशामक अधिकारी हे वर्ग १ दर्जाचे पद मंजूर केले आहे. त्याची जाहीरात काढतोय. सध्या वर्ग ३ दर्जाचे जे अधिकारी आहेत. हे पद सरळ सेवा पद्धतीने भरणार आहोत. त्यानुसार हा प्रश्न मार्गी लागला आहे. मध्यंतरी अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे याचे नियंत्रण दिले आहे. कारण अतिरिक्त आयुक्त हे अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी आहेत. यापूर्वी त्यांनी अपर जिल्हाधिकारी, दंडाधिकारी म्हणून काम पाहिले आहे. आपत्ती व्यवस्थापन याचे त्यांना पूर्ण ज्ञान आहे. त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवली आहे.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, आत्ता आयुक्त साहेबांनी जे उत्तर दिले आहे. मा.दत्ता साने आपण सुद्धा थोडेसे शांतीने घ्यावा. जर हद्दीपासून १० कि.मी. अंतरापर्यंत एनओसी देण्यास मंजूरी असेल, शासनाने यादीतील गावांना मंजुरी दिली असेल तर त्याला आपण काही करु

शकत नाही. या गावांना आपण सेवा द्यावी असे आदेश दिलेले आहेत. आत्ता आयुक्तांनी सांगितले, त्याव्यतिरिक्त गावे असतील तर कारवाई करतील. हे उत्तर पुरेसे आहे. यावर अधिक चर्चा थांबवावी व सभागृह चालू करावे अशी विनंती करतो.

**मा.महापौर -** प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---------------

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ३७९ | विषय क्रमांक - १ |
| दिनांक - २०/११/२०१३ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१८/कावि/११५६/२०१३, दि.१४/१०/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १७/१०/२०१३ ठराव क्र.४३६३ नुसार

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे महापालिका व शिक्षण मंडळ आस्थापनेवरील सर्व कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांना सन २०१२-१३ करिता व पुढील २ वर्षासाठी मान्यताप्राप्त युनियनशी करारनामा करुन बोनस व सानुग्रह अनुदान मा.महापालिका सभेच्या उमेदमान्यतेवर देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.श्रीरंग बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, २ तासांपासून सभागृह चालले आहे. परंतु या दोन तासांत सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक प्रामुख्याने जास्त बोलले आहेत. प्रामुख्याने आयुक्त साहेब शिक्षण मंडळाच्या या विषयाच्या अनुषंगाने मी लक्ष वेधू इच्छितो, वर्तमानपत्रांमध्ये गेले ८ दिवस सातत्याने शिक्षण मंडळाच्या स्वेटरबाबत बातम्या येत आहेत. शिक्षण मंडळाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना जे शालेय साहित्य पुरवले जाते. ते वेळेत पुरवले जावे. हे साहित्य पुरवत असताना त्यात प्रामुख्याने भ्रष्टाचार होऊ नये. केवळ भ्रष्टाचारावर गेले २ तास सभागृहाचे कामकाज चालू आहे. माझ्या माहितीप्रमाणे जे बूट आपण विद्यार्थ्यांना देतो. शाळा सुरु होऊन ६ महिने झाले आहेत. १५,००० दिले आहेत. ३५,००० बूट वाटायचे राहीले आहेत. स्वेटरबाबत जी निविदा निघाली होती. त्यावेळी ९ जणांनी निविदा दाखल केली होती. प्रामुख्याने त्यामध्ये रिंग होत होती. असे असताना स्वेटरबाबत ठराविक ठेकेदारांनी एकत्रपणे येऊन काम टाकले होते. म्हणून काही ठेकेदारांचे दोन नंबरचे पाकीट उघडत नाहीत म्हणून स्वेटरचे टेंडर ओपन न झाल्यामुळे स्वेटर वाटप होत नाही. मी

आपल्याला अनेक वेळा सांगितले, अनेक शाळांवर शिक्षक कमी आहेत. शिक्षण खात्याचा मनमानी कारभार प्रामुख्याने प्राथमिक शिक्षण खात्याकडून चालू आहे. उदा. एका शिक्षकाची एका महिन्यात चार वेळा बदली केली गेली. सन्मा.सदस्यांनी माहिती घेतली तर आपल्याकडे जास्त शिक्षक असतील तर ॲडजेस्टमेंट करण्यासाठी प्रामुख्याने बदली केली जाते म्हणून तुम्हाला सांगतो, याचा सर्वांनी बारकाईने विचार करावा. जेणेकरुन प्राथमिक शिक्षणापासून जे दिले जाते. त्याकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे. महापालिकेच्या शाळेत कोणता विद्यार्थी जातो. ज्याची आर्थिक परिस्थिती नाही. मग तो इंग्रजी माध्यमात जाऊ शकेल का. त्याचे आईवडील उच्च शिक्षण संस्थेत त्याला टाकू शकत नाहीत. असे असताना केवळ त्याठिकाणी राजकीय हेतूपोटी काही शिक्षकांच्या जाणिवपूर्वक बदल्या केल्या जातात. म्हणून महापालिकेचा आपला त्यांच्यावर कंट्रोल आहे. सरसकट विचार केलातर आजदेखील ब-याचशा शाळांत अस्वच्छता आहे. टॉयलेट स्वच्छ होत नाहीत. विद्यार्थ्यांचा गणसंख्या जास्त असल्यामुळे देखील तिथे शिक्षक मिळत नाहीत. शालेय साहित्य वाटपासाठी अंदाजपत्रकात चांगल्या स्वरुपात रक्कम दिली जाते. तरीसुद्धा साहित्य वाटप केले जात नाही. कशासाठी वाटप करतो, केवळ ठेकेदारांना पोसण्यासाठी, केवळ ठराविक मंडळी डोळ्यासमोर ठेवून. यात जातीने लक्ष घालावे. विषयाला विरोध नाही. प्राथमिक शिक्षण संस्था इथे गोरगरीब विद्यार्थी, गोरगरीब विद्यार्थी शिकतात. त्यांची गरज पाहून शालेय साहित्य वेळेवर दिले पाहिजे. शाळेत स्वच्छता वेळेवर झाली पाहीजे. यासाठी काळजी घेऊन कामे केली पाहीजेत.

**मा.सुलभा उबाळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्राथमिक शिक्षण विभागासंदर्भात, शालेय साहित्य खरेदीसंदर्भात आपल्याकडे अनेक तक्रारी लेखी स्वरुपात प्राप्त झाल्या आहेत. आत्ता मा.श्रीरंग बारणे यांनी सांगितले. त्याला मी अनुमोदन देते. जून महिन्यात शाळा सुरु झाल्या. तळवडे येथील महापालिकेच्या शाळेत मा.मुख्यमंत्री येणार होते. सुदैवाने ते आले नाहीत म्हणून बरे झाले. तिथे जाहीर केले होते पहिल्या दिवशी शाळा सुरु होताना सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटणार आहोत. आज शाळा सुरु होऊन सहामाही संपली, दुसरे सेक्शन चालू झाले आहे तरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवू शकलेलो नाही. त्यामागची कारणे आत्ता आप्पांनी सांगितली आहेत. प्राथमिक शिक्षण विभागात काही ठेकेदारांची मोनोपॉली आहे. आपल्याला कायम लेखी पत्रे दिली गेली आहेत. काही महिला संस्था शिक्षण मंडळाच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करतात. जेणेकरुन यांची रिंग मोडली जाईल. काय काळाबाजार चालला आहे, तो समजून घेण्यासाठी प्रयत्न केले जात असताना सुद्धा आपल्याला पत्र देऊन सुद्धा काही झाले नाही. शिक्षण मंडळातील ई-टेंडरींग म्हणजे तिथे चुना लावायचे काम आहे. घरी बसून टेंडर भरतात हे खरे असले तरी आपण निविदा भरण्याआधी

निविदेचे नमुने मागतो. निविदा भरणारा आदल्या मिनिटापर्यंत थांबतो. निविदा मागतो याचा अर्थ निविदा जमा होतात, त्यावेळी पावती भरावी लागते. त्यावेळी कोण-कोण टेंडर भरणार ते समजते. मग त्याच्यावर दबाव आणला जातो. त्याला त्याठिकाणी थांबवले जाते. हे तितकेच सत्य आहे. काही ठेकेदारांनी स्वतःच्या नावाने, घरातल्या कुटूंबाच्या नावाने ६/७ फर्म उघडल्या आहेत. वेगवेगळे पत्ते दाखवले आहेत. काही मंडळी आधीच खरेदी करुन ऑर्डर मिळणार या भावनेनेच काम करतात. त्यांना कोणी अडवू शकत नाही हे निर्विवाद सत्य आहे. फक्त शिक्षण मंडळाचे बजेट आल्यानंतर प्रत्येक वर्षी आपण या विषयावर बोलत असतो. त्यावर चर्चा करत नाही. शिक्षण मंडळ ही स्वायत्त संस्था असली तर आपल्याकडे त्याचा कंट्रोल दिला आहे. सदस्य नेहमी येऊन सांगतात. शिक्षण मंडळाच्या काही सदस्यांनी गैरप्रकार रोखायचा प्रयत्न केला तरी तिथे ठेकेदारांची एवढी उचल आहे की ते डायरेक्ट पवार साहेबांपर्यंत जातील, मुख्यमंत्र्यांपर्यत जातील, दिल्लीला जातील. अशा प्रकारे प्रेशर आणले जाते. हे बरोबर आहे का हे कसे चुकीचे आहे. सर्वीस टॅक्स चुकवला जातो. वॅट चुकवला जातो. कोणी थांबवायचा प्रयत्न केला तर आमच्यासारख्या सदस्यांना सुद्धा दामदाटी केली जाते. तुमचे नगरसेवक पद कसे रद्द केले जाईल हे सांगितले जाते. असे गैरप्रकार थांबवले पाहीजेत. प्रत्येक निविदेतील अटी शर्ती वेगळ्या वेगळ्या आहेत. बुटाच्या निविदेतील अटी शर्ती वेगळ्या, स्वेटरच्या निविदेतील अटीशर्ती वेगळ्या आहेत. वह्यांच्या टेंडर मधील निविदेतील अटी शर्ती वेगळ्या आहेत. असे का. भांडार विभागाच्या अटी शर्ती वेगळ्या असणार. जो ठेकेदार त्या पूर्ण करु शकतो अशा अटी तिथे टाकल्या जातात. काही ठेकेदार यात एन्ट्री करु इच्छितात. ती सॉलेन्सी एवढ्या प्रमाणात असते की तो ते सर्टिफिकिट आणू शकत नाही. तो निविदा भरु शकत नाही. काही निविदांसाठीच सॉलेन्सीची अट ठेवली आहे. सगळ्या निविदांसाठी सॉलेन्सीची अट का नाही. यावर उत्तर दिले जात नाही. शिक्षण अधिका-यांची परिस्थिती काय ते सगळ्यांना माहित आहे. ते कागद जोडू शकत नाहीत. यावर मार्ग काढावा. शिक्षण मंडळाच्या खरेदीवर नियंत्रण आणले पाहिजे. महापालिकेची बदनामी करण्यात प्राथमिक शिक्षण मंडळ पहिल्या पाचमध्ये असेल हे मला सांगायची इच्छा होते. शाळांचा शैक्षणिक दर्जा या गोष्टीवर सगळे सभागृह चर्चा करु शकते. सगळ्यांना याबाबत माहिती आहे. आपण शाळांच्या अस्वच्छतेबाबत चांगला निर्णय घेतला आहे. शाळांच्या अस्वच्छतेत सुधारणा होते आहे. शाळांची पटसंख्या देखील वाढली पाहीजे. पटसंख्या वाढवायची असेल तर शालेय साहित्य चांगल्या दर्जाचे असणे गरजेचे आहे. आम्ही आमच्या मुलांना दरवर्षी युनिफॉर्म घेत नाही. आमच्या मुलांना दरवर्षी स्वेटर घेत नाही. पण आपण नगरपालिकेच्या शाळांतील मुलांना दरवर्षी बूट,स्वेटर, गणवेष खरेदी करुन देतो. तरीसुद्धा आपली पटसंख्या एवढी कमी आहे. झोपडपट्टीतील मुले महापालिकेच्या शाळेत जायला उत्सुक नसतात. आजुबाजूच्या प्रायव्हेट

शाळांत अडमिशन घ्यायला लागले आहेत. याचे कारण काय. आपल्या शिक्षकांना आपण एवढा पगार देतो. महाराष्ट्रात शिक्षकांना कुठेही इतका पगार नाही. त्याबदल्यात आपण गुणवत्ता देऊ शकत नाही. आयुक्त साहेब, आमची अपेक्षा आहे, आपण शिक्षण मंडळाचा कारभार सुधारण्याकडे लक्ष द्यावे.

**मा.अनिता तापकीर –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आम्ही महापालिकेच्या शाळांत एक महिन्यापूर्वी व्हिजिट घेतली. शाळेच्या पायरीपासून चढतानाच टॉयलेटचा वास येत होता. तिथेच मुले उभी होती. पाण्याचे फिल्टरींग सुद्धा बंद होते. फरशी इतकी चिकट होती. मुले शाळेत शिक्षण घेण्यासाठी जातात. शाळेत स्वच्छतेचे प्रमाण खूप कमी आहे. मुलांना वर्ग झाडायला लावतात. त्या मुलांनी काय शिकायचे. गरीबांची मुले शाळेत येत असतात. स्वच्छता नाही. मुतारीचा वास इतका येत होता. अक्षरशः डोके उठले होते. ही मुले तिथे कशी वावरत असतील.

**मा.तानाजी खाडे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शाळेबद्दल सांगायचे झालेतर माझ्या भागात शाळा क्रमांक 2/1, 2/2 या शाळेत तीन हजार विद्यार्थी शिकत आहेत. मा.श्रीरंग बारणे यांनी विषय काढला त्यावेळी टेंडरसंदर्भात विषय असेल तर त्यात कमिटी लक्ष घालते. पावसाळ्यात स्वेटर, उन्हाळ्यात रेनकोट असे उलटे विषय होत असतात. मागील वर्षीदेखील रेनकोटचे वाटप केले. आज आयुक्त साहेबांनी आपल्यावर आलेले दोष फेटाळले. निश्चित तो त्यांचा अधिकारी आहे. ज्या गोष्टी घडल्या आहेत, इथून पुढे या गोष्टी घडू नयेत अशी विनंती आहे. आपल्या काळात शाळेवर बीव्हिजीचे कामगार काम करत होते. त्यांनी काम बंद केल्यामुळे आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला होता. शाळेवर वॉचमन नाही, सिक्युरीटी नाही. पिंपरी नगर महापालिका शाळेत मध्यंतरी एका मुलाला जीव गमवावा लागला. असा विषय झाला असताना ज्याठिकाणी झोपडपट्या आहेत, त्या त्या ठिकाणी शाळेवर वॉचमन असणे गरजेचे आहे. दिवाळीच्या दिवसांत शाळेचे गेट तोडले गेले, टाक्यांची झाकणे, नळ चोरीला गेले आहेत. त्यात मुलगा चुकून पडला तर नाहक बळी जाणार आहे. तुम्ही म्हणता, ही अतिरिक्त आयुक्त यांची जबाबदारी आहे. आयुक्त म्हणून आपणदेखील यात लक्ष घालावे. माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक नव्हते. म्हणून मुलांनी शाळा बंद करायचा प्रयत्न केला. 10 वीची परीक्षा होती. विषय शिकवायला शिक्षक नाहीत. आजदेखील माझ्या भागातील माध्यमिक शाळेचा निकाल शंभर टक्के लागतो. चांगले शिक्षक घ्यावेत. शाळा चांगली घडवावी. काही शिक्षकांच्या बदल्या केल्या. पण तिथे दुसरा शिक्षक दिला नाही. ज्या शिक्षकांच्या बदल्या केल्या, त्या त्यांच्या सोयीनुसार झाल्या आहेत. आत्तादेखील माझ्या भागातील शाळेत शिक्षक नाहीत. या गोष्टी गांभिर्याने घेतल्या नाहीतर हे करोडो रुपये कशासाठी खर्च करतोय? फक्त ठेकेदारांसाठी.

शाळांचा दर्जा चांगला सुधारण्यासाठी चांगले शिक्षक दिले पाहीजेत. शिक्षक कमी आहेत. मुख्याध्यापकांना प्रमोशन देण्याबाबत दुमत नाही. काही भागांत मुख्याध्यापक त्यांना कोणीही घाबरत नाहीत. शाळेचे नियोजन बिघडले जाते. विद्यार्थी संख्या घटत चालली आहे. प्राथमिक शाळांतील विद्यार्थी संख्या फार कमी झाली आहे. माझी सभागृहाला, आपल्याला विनंती आहे, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांनी महापालिकेच्या माध्यमिक व प्राथमिक शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी यात गांभिर्याने लक्ष घालावे. झोपडपट्टीतील मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहीजे. त्यांना जे शिक्षण पाहिजेत, त्या विषयाचे शिक्षक देण्यात यावेत अशी विनंती करतो.

**मा.अनंत को-हाळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझ्या घरासमोर महापालिकेची एक शाळा आहे. या शाळेमध्ये काही पालक वर्ग आला व त्यांनी अक्षरशः शिक्षकांना शिवीगाळ केली. तुम्ही पटसंख्येचे कारण देता. पण महापालिकेच्या शाळेत एकात वर्गात पहीली व चौथीतली मुले व दुस-या वर्गात दुसरी व पाचवीतली मुले बसवली जातात. एक शिक्षक दोन वर्गांना शिकवत असतो. केशवनगरच्या शाळेची परिस्थीती मी दोन/तीन वेळा फोन करुन ऊबाळे मॅडम यांना सांगितली होती. काही दिवसांपूर्वी परिस्थिती एवढी हाताबाहेर गेली की, पालक वर्ग आला व त्यांनी शिक्षकांना घाणेरड्या पद्धतीने शिवीगाळ केली. मुलांना ज्या अपेक्षेने शाळेत शिकायला टाकले जाते, त्या प्रकारचे शिक्षण त्यांना तिथे मिळत नाही. शिक्षण मंडळातील व्यवहार, ठेकेदार पद्धतीने सर्व निविदा घेतल्या जातात. हिवाळा संपल्यानंतर स्वेटर दिले जातात. मुलांना खालच्या दर्जाचे दप्तरे दिली गेली आहेत. आपण ठेकेदाराला अडव्हान्स पेमेण्ट केले आहे. मा.आयुक्त साहेब, आपण इथे चांगले काम करताय. नागरीकांच्या आपल्याकडून अपेक्षा निश्चितपणे खूप वाढलेल्या आहेत. शिक्षण मंडळाच्या कारभारावर बारकाईने लक्ष द्यावे. काही दिवसांपूर्वी महापालिकेच्या शाळेवर वॉचमन नसल्यामुळे अग्निशामकचे आग विझवण्यासाठी असणारे सिलेंडर काही लोकांनी येऊन पाडले व फोडले. शाळांमध्ये स्वच्छतेचा प्रॉब्लेम आहे. मी महापालिकेचा कर्मचारी साफसफाईसाठी पाठवला होता. शाळेत सिक्युरीटी गार्ड असावा. शाळेमध्ये बरेच गैरप्रकार घडत आहेत. आपण या कारभारावर लक्ष द्यावे. आपण जाणिवपूर्वक लक्ष घालून सुधारणा घडवून आणाव्यात अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.महापौर** – प्रत्येकाच्याच वॉर्डात शाळा आहेत. आपण त्यावर चर्चा करतोय.

**मा.आशा शेंडगे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी गेल्या तीन/चार स्थायी समिती सभांमध्ये सातत्याने या विषयावर बोलले आहे. आयुक्त साहेबांकडून अनेक वेळा तुटपुंजी उत्तरे दिली जातात आणि विषयाला विराम दिला जातो. महापालिकेच्या शिक्षण मंडळाने शाळा

स्थापन केल्या आहेत. अशा ठिकाणी शाळा सुरु करायचा महापालिकेचे धोरण काय होते. आर्थिकदृष्ट्या मागास परिस्थितीतील मुलांना महापालिकेने शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी हा आपला हेतू खरेच आज साध्य होतो आहे का. ही मुले चांगले नशीब घेऊन आली नाहीत हा त्यांच्या नशीबाचा भाग आहे. त्यांना चांगले करण्याचे काम पिंपरी चिंचवड निश्चत करु शकते होते. परंतू आपल्या प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे त्यांचे नशीब उजळायचे हे देखील केले जात नाही. याला कोण जबाबदार असणार आहे. मी अतिरिक्त आयुक्तांकडे काही पूरावे दिले होते. माध्यमिक शाळेतील एका शिक्षकाची 3/4 वेळा बदली केली गेली. याला कोण जबाबदार असणार आहे. यातून आपण काय साध्य करतो. निश्चितपणे यातून पैसे घेऊन भ्रष्टाचार करतो. शिक्षण क्षेत्रात जात असताना सुद्धा भ्रष्टाचाराचा पाया आपणच रचतो की काय असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय रहात नाही. दि.28/10/13 रोजी अतिरिक्त आयुक्त आमच्या समोर त्याचे उत्तर देणार आहेत. हा विभाग नक्की कोणाकडे आहे. ज्यांच्याकडे आहे त्यांनी त्याचे उत्तर दिलेतर जास्त सोयीचे होईल. दि.28/10/13 रोजी झालेल्या सभेत त्यांना मी काही मुद्दे दिले होते. काही शिक्षकांची नावे सांगितली होती, त्यांची 3/4 वेळा बदली झाली, त्यांची नावे दिली आहेत. मध्यंतरी मला आयुक्त साहेबांकडून माहिती मिळाली. माहिती यापेक्षा वेगळी होती. कागदोपत्री माहितीनुसार 3 वेळा 6 शिक्षकांच्या बदल्या केल्या. 34 शिक्षकांच्या बदल्या 2 वेळा केल्या. याचे कारण काय. शिक्षण मंडळ आपल्याकडे येत नाही, ते पाहणार अशी प्रत्येक वेळी उडवाउडवीची उत्तरे देऊन हे होणार आहे का. डेडलाईन सांगा. प्रत्येक वेळी मी शोधणार, करणार असे किती वेळा करणार आहात. आयुक्त साहेबांना ठोस माहिती देता येत नसेलतर यापेक्षा वेगळी खंत ती काय. अजून 15 दिवस वेळ द्या असे त्यांनी सांगितले. कदाचित दि.4/11/13 ला ते माहिती देतील अशी अपेक्षा आहे. मा.आप्पा बारणे यांनी जे मुद्दे उपस्थित केले, त्याबद्दल धन्यवाद मानते. माझ्या मनात रोज चालणारी सल मला इथे सभागृहात मांडता आली. आपण ते करु शकत नाही. हे आपल्या अधिकारांत येत नाही. म्हणजे नेमके काय करायचे याचा खुलासा करावा. जूनमध्ये शाळा सुरु झाल्यानंतर स्वेटर उन्हाळ्यात, रेनकोट हिवाळ्यात, बूट दिवाळीनंतर. वर्षानुवर्षे हीच परंपरा चालू आहे. प्रत्येकवेळी शिक्षण मंडळच याला जबाबदार आहे असे म्हणून चालणार नाही. प्रशासन प्रमुख म्हणून आपलीही काही जबाबदारी आहे, याचा खुलासा करावा. नंतर मला बोलायचे आहे.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाच्या विषयाच्या अनुषंगाने मला बोलायचे आहे. आपण कोट्यावधी खर्च करुन शिक्षण मंडळाचा कारभार चालवतात. तसे बघायला गेलोतर इतर महापालिकांपेक्षा आपल्या महापालिकेत चांगल्या सोयी-सुविधा देत आहोत. इतर महापालिकांतील शिक्षकांपेक्षा चांगला पगार आपण त्यांना देतोय. तरीदेखील

आपल्यासमोर गांभिर्याने मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. एवढे करुन देखील आपली पटसंख्या घसरत असल्यामुळे शाळांची मान्यता रद्द करुन दोन शाळांची एक शाळा करायचे धोरण येण-या काळात राबवावे लागेल. पटसंख्या का घसरतेय याचे कारण आपल्यालाही कळते आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण एवढे कोट्यावधी रुपये खर्च करतोय. मुलांचा दर्जात्मक व गुणात्मक विकास कसा झाला पाहीजे. विनाअनुदानीत शाळेत भरघोस पैसे दिल्यानंतरही पालक मुलांना तिथे शिकायला पाठवतात. कारण दर्जात्मक व गुणात्मक शिक्षण तिथे मिळते. ते आपण इथे देत नाही असेही दिसून येते आहे. शाळेत काही विषयांचे शिक्षक देखील दिले गेले पाहिजेत. माध्यमिक शाळा असो, प्राथमिक शाळा यांतील विद्यार्थ्यांमध्ये इतके गुण आहेत. त्यांना फक्त भाषेची अडचण आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा झाल्यामुळे. मायबोली मराठीचा मला सुद्धा आदर आहे. तरीसुद्धा आपल्या विद्यार्थ्यांवर आपण कोट्यावधी रुपये खर्च करुन सुद्धा शाळेतील विद्यार्थी संख्या कमी आहे याचा सुद्धा विचार केला पाहीजे. महापालिकेची शाळा व थरमॅक्स शाळा या एकाच भिंतीतल्या शाळा असताना दोन्ही शाळांमधील मुलांच्या गुणवत्तेत खूप मोठा फरक जाणवतोय. थरमॅक्स शाळेला खूप चांगला रिसपॉन्स मिळाला. जे थरमॅक्स शाळेत प्रवेश घेऊ शकले नाहीत त्यांची काय चूक आहे. महापालिका शाळेतील या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्याप्रकारची शिक्षण प्रणाली, शिक्षक उपलब्ध केले पाहीजेत. आपण कोट्यावधी रुपये खर्च करतोय याचे सुद्धा समाधान आपल्याला मिळेल.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब व मा.अतिरिक्त आयुक्त साहेब, वास्तविक पाहता, कार्यपत्रिकेवर शिक्षण मंडळातील अधिकारी व कर्मचा-यांना बोनस व सानुग्रह अनुदान देण्याचा विषय आहे. मघाशी मा.श्रीरंग बारणे बोलले की सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक जास्त बोलतात. आमचे प्रमाण पण जास्त आहे. आम्ही 72 टक्के आहोत. आम्ही जास्त बोलणारच. तुम्ही बॉम्ब टाकून दिला. सर्वांनी बोलायला सुरुवात केली. एकंदरीत शिक्षण व्यवस्था व महापालिकेच्या शाळा यासंदर्भात सर्व सभागृहात प्रचंड नाराजी दिसते आहे. माझी अति.आयुक्त यांना विनंती आहे, सभागृहाला विनंती आहे की, हा एण्डलेस विषय आहे. आपआपल्या भागातील शाळा, त्याच्या स्वच्छतेचा विषय,शिक्षकांच्या तक्रारी, आस्थापनाविषयी ज्या काही तक्रारी असतील त्याबाबत आपण अतिरिक्त आयुक्त यांना पत्र लिहावे की, अशा-अशा अडचणी आहेत. शिक्षण मंडळाच्या कारभाराविषयी सांगितले जाते आहे. या शिक्षण मंडळापेक्षा, अधिका-यांपेक्षा सांगण्यात आले, सुलभाताई उबाळे यांनी तर सुप्रियाताई सुळे, अजित पवार, मुख्यमंत्र्यांचे नाव घेऊन टाकले. ठेकेदार त्यांच्याकडे जातात. कदाचित त्यांच्या ताकदीत असते तर ते उद्धव ठाकरे यांच्याकडे सुद्धा गेले असते. ज्या पद्धतीच्या तक्रारी केल्या गेल्या आहेत.

सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की, असे हे लोक इतके बडजंग आहेत, ते कोणाला घाबरत नाहीत. मा.आयुक्त साहेब, मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांनी यात खास लक्ष घालावे. मुलांना दर्जेदार वस्तू वेळेत मिळण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. नगरसेवकाच्या वॉर्डातील समस्या असते, शहराची समस्या असो, टॉयलेटचा विषय असो. मघाशी तापकीर ताईंनी सांगितले. मा.शेंडगे ताई या स्वतः शिक्षिका आहेत, त्यांनी स्थायी समितीमध्ये हा प्रश्न वारंवार उपस्थित केला असे म्हणतात. थोडक्यात म्हणजे शिक्षण मंडळाच्या कारभाराबद्दल, शाळेबद्दल कोणीही समाधानी नाही. इतके कोट्यावधी रुपये खर्च करत असताना दर्जेदार शिक्षण मिळावे. तिथले पावित्र्य राखले जावे. गणवेश, पुस्तके, दप्तर वेळेत मिळावे. यात कोणीही चूक करु नये. शिक्षणासारखे पवित्र कार्य करत असताना महापालिकेत बजेटला सर्वजण नेहमी मान्यता देतात. यात कटाक्षाने लक्ष घालावे. हा विषय फक्त सानुग्रह अनुदानाचा विषय आहे. हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३८० विषय क्रमांक – २

दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.संगिता भोंडवे, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव

२)मा.स्थायी समिती सभा दिनांक १७/१०/२०१३ ठराव क्र.४३६४ नुसार

घंटागाडी ठेकेदारांना र.रु.१३,०००/- (अक्षरी र.रु.तेरा हजार फक्त) दिपावली निमित्त विशेष बाब म्हणून विनापरतावा बक्षिस रक्कम अदा करणेस ( सन २०१२-१३ या एका आर्थिक वर्षामध्ये सहा महिन्यापासून पूर्ण वर्षापर्यंत सलग काम केले असल्यास त्यांना यथाप्रमाण बक्षिस रक्कम देय राहील. सहा महिन्यापेक्षा कमी काम केलेल्या कोणत्याही घंटागाडी ठेकेदारांना बक्षिस देय राहणार नाही ) व त्या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.महानगरपालिका सभेच्या उमेद मान्यतेवर मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/१०/२०१३ ठराव क्र.४४४३ नुसार

नादब्रम्ह परिवार संस्थेचे शास्त्रीय संगिताचा प्रचार, प्रसार आणि अभिजात संगीत नाटकाची निर्मीती आणि प्रयोग सादरीकरणाचे कार्य विचारात घेता सदर संस्थेस महोत्सवाचे आयोजनाकामी र.रु.वीस लाख शासन मान्यतेच्या अटीवर (३० लाखाचे मर्यादेव्यतिरिक्त) मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे**– मा.महापौर साहेब, हा विषय दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मांडतो

**मा.राजेंद्र जगताप–** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -३८१ विषय क्रमांक – ३

दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/१०/२०१३ ठराव क्र.४४४३ नुसार

विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३८२ विषय क्रमांक – ४
दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/१०/२०१३ ठराव क्र.४४४४ नुसार

सासवड येथे ८७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजनासाठी मनपातर्फे र.रु.दोन लाख नव्याण्णव हजार (तीस लाखाचे मर्यादेव्यतिरिक्त) अनुदान ८७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सासवड या नावे मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –
अनुकूल -९१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५
दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सावा/४/कावि/४७/२०१३, दि.०३/१०/२०१३
२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्रमांक १०९ नुसार
३) मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/१०/२०१३ ठराव क्र.४४९१ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १६ सार्वजनिक वाचनालय चालविणेसाठी सध्या होणारा एकूण खर्च र.रु.१,३१,२१,७२२/- येत असून १६ सार्वजनिक वाचनालयाचे वार्षिक उत्पन्न मार्च २०१४ अखेर अंदाजे र.रु.३,२६,१२२/- तसेच KRAमध्ये सुचविलेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये नविन गावे समाविष्ट झाल्याने नव्याने सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १६ सार्वजनिक वाचनालयाच्या

वार्षिक खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. तसेच पुस्तकाच्या किंमतीमध्येही वाढ होत आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग परिपत्रक जी.ई.एन.१०९८/२५८/प्र.क्र.७०/९८ नवि-२४ दिनांक २/७/१९९८ अन्वये महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबत कळविले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २९ मधील ४५८ (४२) या तरतूदीस अधिन राहून व राष्ट्रीय मुल्यवृध्दीच्या अल्प बचत योजनांनुसार विचार करता सार्वजनिक वाचनालयांचे शुल्क त्या प्रमाणात खालील प्रमाणे वाढविणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या शुल्क वाढीमुळे साधारणतः (एका वाचनालय) महसूल र.रु.७६,५००/- अपेक्षित असून १६ वाचनालयांचे सभासदांपासून महापालिकेस अंदाजे र.रु.१२,२४,०००/- इतका महसूल मिळेल. सबब सार्वजनिक वाचनालय शुल्कात माहे १ एप्रिल २०१४ पासून पुढील प्रमाणे दरवाढ सुचविणेत येत आहे.

१) वाचनालय अनामत र.रु.५०/- ऐवजी र.रु.२००/-

२) वाचनालय मासिक वर्गणी र.रु.१५/- ऐवजी र.रु.३०/-

३) वार्षिक वर्गणी आगाऊ र.रु.१२५/- ऐवजी र.रु.३००/-
(वर्गणी आगाऊ न भरल्यास र.रु.३६०/-)

४) वाचनालय प्रवेश शुल्क र.रु.१०/- ऐवजी र.रु.१०/-

उपरोक्त प्रमाणे शुल्कात वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सार्वजनिक वाचनालयाच्या विषयाच्या अनुषंगाने विषय मांडायचा आहे. परिस्थिती गंभीर आहे याची सर्वांना जाणिव आहे. व्हिजिलन्स नक्की काय करतो. हा प्रस्न पडतो. व्हिजिलन्स काढून टाका नाहीतर ऑडीट तरी काढून टाका. ऑडीटमधे अडवणार, व्हिजिलन्सवाले अडवणार. सहा.आयुक्तांचे पथक कधीतरी येणार. नक्की काय चालले आहे कळत नाही. सांगवीतल्या वाचनालयाची दुरुस्ती करा हे ३ वर्षांपूर्वी सांगितले होते तेव्हा झाली नाही. आत्ता तुमचे पथक आले तर लगेच काम झाले. याला बजेट आहे का, खर्च आहे का, काम आहे का. कोणीही येणार काम करणार. प्रशासनाची अशी मनमानी चालणार नाही. आमच्या पत्राला काही व्हॅल्यू नाही. आपली मनमानी, आपल्याला सुधारणा कराव्याशा वाटल्या की त्या चांगल्या असतात. आम्हाला वाटले की. आमच्या सुद्धा मागण्या आहेत, अडचणी आहेत. महापालिकेच्या मालकी हक्काचे जलतरण तलाव असतील, वाचनालय असतील, जिमनॅशियम असतील, शाळा, कार्यालये असतील, वेगवेगळे युनिटस् असतील चांगले राहीले पाहीजेत. ज्या-ज्या ठिकाणी नागरीकांचा संबंध येतो,

त्याठिकाणी आमच्या सांगण्याप्रमाणे सुधारणा करणे, तुम्हाला आम्ही सांगणे क्रमप्राप्त आहे. आमच्या पत्राचा उल्लेखच करत नाही. तुम्हाला वाटले ते चांगले वाटले म्हणून ते केले. व पदाधिका-यांना वाटले ते चुकीचे अशा चुकीच्या पद्धतीने कामे करु नयेत असे मला वाटते. आमच्या स्थानिक वॉर्डातील जे.ई. हातचे काम सोडतो व त्या व्हिजिलन्सचे, भरारी पथकाचे काम करत असतो. आमच्याही अडचणी आहेत. त्या तुमच्या भरारी पथकाकडून, व्हिजिलन्स कडून अडचणी येतात त्या तुम्हीच सोडवायच्या असे तुम्ही समजायचे कारण नाही. तुम्ही कोणत्याही कामाची निविदा प्रक्रिया बघा. तुमच्याकडे सँक्शनसाठी व्हिजिलन्सकडे फाईल येते. ऑडीट विभागाकडे पण जाते. ऑडीटवाले त्रास देतात. आक्षेप नाही. शंभर टक्के जास्त काम झाले पाहीजे. मी जी.बी.त विचारणार, तुम्ही म्हणता शंभर टक्के बजेट संपवले आहे. तुम्ही नागरीकांचे प्रश्न सोडवताय अतिशय चांगली गोष्ट आहे. तुमचेच काम आहे. मग आमच्या तक्रारींची सुद्धा दखल घेतली पाहीजे. तुम्ही भरारी पथक आल्यानंतर दुस-या दिवशी लगेच काम सुरु. आम्हाला सुद्धा भरारी करावी लागेल. प्रशासनाची सगळी कामे योग्य व आम्ही सांगू ते चुकीचे असे असेल तर हा तुमचा समज चुकीचा आहे. तुम्ही काम करताय हे अतिशय चांगले असले तरी आमच्याला सुद्धा गैरसमज वाटू नये असे तुम्ही पण वाटून घ्या. संबंधित नगरसेवकांला हे कळाले पाहीजे. सारथीबाबत मी एक विनंती केली होती, तक्रारदाराचे नाव सांगू नका पण माझ्या वॉर्डातली तक्रार असेल तर मला त्याचा एसएमएस आला पाहीजे. कायद्याने आम्हालाही ५ वर्षे अधिकार दिलेला आहे. तुम्ही कसे नाही म्हणता. तक्रारीचे स्वरुप आम्हाला कळाले पाहीजे. आम्ही कुठेतरी तक्रारी सोडवून त्या मार्गी लावल्या म्हणून इतकी वर्षे सभागृहात आहोत. आपण नेमलेली भरारी पथके अतिशय चांगली आहेत. पण त्यातून काम व्हायला वेळ लागत असेल तर काय उपयोग. आम्ही सांगितलेली कामे नंतर होणार असतील, त्यांची कामे आधी होणार असतील तर तुमची प्रायोरीटी लिस्ट चुकीची आहे. आपण एका पब्लीक बॉडीचे आयुक्त आहात पण तुम्ही आम्हाला देखील किंमत द्यावी. देता पण कामाच्या पद्धतीत बदल व्हावा. कुठेतरी आम्हाला सुद्धा विचारात घेतले जावे. तुम्हाला वाटते ते योग्य व आम्हाला वाटते ते शंभर टक्के चुकीचे या वेगळ्या भुमिकेतून पाहताय हा गैरसमज चुकीचा आहे. याची कृपया दखल घ्यावी.

**मा.शमीम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वाचनालयाची अनामत रक्कम व मासिक वर्गणी वाढवण्याबाबत विषय आला आहे. आयुक्त साहेब व अतिरिक्त आयुक्त साहेब यांना मला विनंती करायची आहे की, उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आपण वर्गणी वाढवावी. परंतू एक महत्वाची गोष्ट आहे, किती वर्षांपूर्वी ही लायब्ररी सुरु केली होती. परवा एक अधिकारी आले होते, त्यांनी माझ्या वॉर्डातल्या वाचनालयाची परिस्थिती पाहीली. त्याठिकाणी

कित्येक वर्षांत नवीन पुस्तके आणली गेली नाहीत. तीच-तीच पुस्तके किती वेळा वाचायची. त्यामुळे सभासद संख्या कमी का होते याचे हे सरळ-सरळ उदाहरण आहे. लायब्ररी कोर्स झालेला माणुस त्याठिकाणी असायला पाहीजे. तो तसा नसतो. शिपाई लायब्ररी चालवत असतो. ते सुद्धा थोडावेळ. त्यादिवशी माझ्या वॉर्डातील वाचनालयास व्हिजिट द्यायला अधिकारी आले होते. त्यांनी पाहिले वाचनालय बंद होते. त्या दिवशी वाचनालय दिवसभर उघडले नव्हते. आत्ता प्रशांत शितोळे यांनी सांगितले. खरेतर आपण सारथीमध्ये तक्रार करावी. वाचनालयात दुरुस्ती करण्याबाबत डेप्युटी इंजिनिअर व जे.ई. यांना कित्येक वेळा सांगितले होते. याठिकाणी कोणी बसायला धजावत नाही. वाचनालय चांगल्या वस्तीमध्ये आहे. पण तिथे बसायला जागा नाही. सगळी जुनी पुस्तके आहेत. काळ बदलला आहे. वाचनालयात पुस्तकाबरोबर अभ्यासाच्या काही सी.डी. सुद्धा उपलब्ध करुन दिल्या पाहीजेत. स्पर्धा परीक्षांची पुस्तके आपण ठेवली पाहीजेत. इंग्रजी माध्यमाची पुस्तके ठेवली पाहीजेत. फक्त वॉर्डातील लायब्ररीमध्येच नाहीतर प्रत्येक प्राथमिक शाळांमध्ये सुद्धा इंग्रजीचे वाचन कसे करता येईल. यासाठी मराठीतून इंग्रजी, इंग्रजीतून मराठी तशी सोप्पी सोप्पी पुस्तके ठेवली पाहिजेत. त्याच्या पट्टया तयार केल्या पाहीजेत. अशा प्रकारची पुस्तके ठेवली तर ग्रंथालय चांगले चालेल. मगर स्टेडियमचे कार्यालयात जे क्रिडा ग्रंथालय आहे तिथे काही उपयुक्त गोष्टी केल्या आहेत का? त्यात भर पडली का? उद्घाटन झाल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष करायचे. ज्या विभागप्रमुखांकडे याची जबाबदारी टाकली आहे, ते नक्की करु शकतील. आत्ता उपसूचना देतील त्याप्रमाणे वाचनालयाचे दर वाढवावेत. वाचनालयांचे काळानुरुप नुतनीकरण आवश्यक आहे ते केले पाहीजे. पुस्तके खरेदी केली पाहीजेत. मुलांना अभ्यासाची पुस्तके घरी दिली पाहीजेत. ज्या ठिकाणी सभासद कमी आहेत ती वाचनालये बंद करुन टाका. १० लोकांसाठी वाचनालय चालवू नये व शेजारच्या एखाद्या वॉर्डात वाचनालय सुरु करावे.

**मा.अतुल शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाप्रमाणे शुल्क वाढवायला खरेतर हरकत नाही. वाचनालयांतील पुस्तकांची अवस्था फारच खराब आहे. वाचनालयांतील फर्नीचर व्यवस्थित असायला पाहीजे. काळाप्रमाणे आय.ए.एस. अधिकारी या भागातून तयार व्हायचे असे बोलले जाते. पुढेही महाराष्ट्रात बरेच अधिकारी तयार होतील. वाचनालयांमध्ये स्पर्धा परीक्षेची पुस्तके उपलब्ध करुन दिलीत तर आपल्यासारखेच क्रांतीकारी अधिकारी तयार होतील.

**मा.सुरेश म्हेत्रे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महापालिका हद्दीत नवीन गावे समाविष्ट झाली, या नवीन गावांत कुठेही वाचनालये चालू झालेली नाहीत. पिंपरी चिंचवडमध्ये एकूण १६ वाचनालये आहेत. त्यांची परिस्थिती आज काय आहे हे ब-याच सन्मा.सदस्यांकडून ऐकले

आहे. फाटलेली पुस्तके, वाचनालयांची परिस्थिती अतिशय खराब आहे. आज मोबाईल, टि.व्ही. वरील १०० चॅनेल्स् यांचा जमाना आहे. अनामत रक्कम वाढवायला हरकत नाही. २/३ प्रकारची पुस्तके ठेवण्यात यावीत. जुन्या काळातली पुस्तके, मध्यम काळातली पुस्तके, नवीन काळातली अशी पुस्तके ठेवलीतर महिन्याला जाऊन वाचता येतील. वाचकांची उत्तम सोय होईल. ६ प्रभागांत अशी वाचनालये उघडावीत असे मला वाटते. वाचनालयांचे प्रवेश शुल्क हा प्रकार मला समजला नाही. केआरए नॉर्मस् प्रमाणे वाचनालये कुठे उघडणार याची माहिती देण्यात यावी.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय महत्वाचा आहे. ज्यावेळी आयुक्त साहेबांनी उत्तर दिले. मा.दत्ता साने यांनी चांगले प्रश्न विचारले होते. त्यांनी महिनाभर तरी कष्ट घेतले आहेत, अभ्यास केला आहे. आयुक्त साहेबांनी उत्तर दिल्यानंतर तुम्ही त्यांना पुन्हा एकदा बोलायला संधी दिली पाहीजे होती ही प्रथा आहे. क्लास ३ च्या कर्मचा-याला १२ कोटींची खरेदी करायच्या पॉवर्स दिल्या आहेत का. मला वाटले हा अधिकारी क्लास २ आहे. इथे महापालिकेत या चूका घडतात. आयुक्त साहेबांकडे असे मॅटर येतात तेव्हा ते ज्युनिअर्सना सस्पेण्ड करतात. फायर ऑफीसरकडून सहाय्यक आयुक्त, अति.आयुक्त नंतर कमिशनरांकडे फाईल गेलेली असते. मग त्यांना कधी पनिशमेंट देत नाही. या चुका इथे घडतात. It is cumulative responsibility from top to bottom. एकदा बिल्डींग परमिशनमध्ये तक्रार केली तेव्हा ४ ज्युनिअर इंजिनिअर यांना पनिशमेंट दिली होती. किरण गावडेंबरोबर त्या काळातील सहा.आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्यावर सुद्धा कारवाई व्हायला पाहीजे होती. नेहमी कर्ता माणूसच मरतो. आम्ही †ण्टी करप्शन यांच्याकडे कशाला जायचे. बिल्डींग परमिशनमध्ये एनओसी देण्यासाठी रु.१००/- खर्च येतो. लोक आम्हाला सांगतात. आम्ही तुमच्याकडेच येणार. तुमच्याकडेच येऊन तक्रार करणार. यावर विचार करा. अण्टी करप्शन यांच्याकडे जायची आम्हाला गरज नाही. तुम्ही अधिका-यांचे हेड आहात. तुम्ही त्यांना मोरल सपोर्ट केले पाहीजे पण त्याने चूक केली, आम्ही फाईंड आऊट केल्यावर ते तुम्ही मान्य केले पाहीजे. आपण वाचनालयांचे शुल्क वाढवताय. रु १२५ ते रु. ३०० रुपये वाढ केली आहे. आपल्याकडे पुण्यातील ब्रिटीश कौन्सिलसारखी एकही लायब्ररी नाही. रिडींगरुम नाही. गरीब मुलांना अभ्यास करायला, वाचण्यासाठी, इंजिनिअरींग करणारी मुले यांना चालणारी पुस्तके लायब्ररीमध्ये ठेवावीत. एकावेळी १००/२०० मुले बसून अभ्यास करतील अशी रिडींग रुम निर्माण करावी. आपण प्राधिकरणात प्लनिंग केले होते, ते झाले नाही. सी.डी. ठेवल्या जाव्यात. वाचनालये अद्ययावत असावीत.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वाचनालयांच्या दरात वाढ करणे आवश्यक आहे. आत्ता आपण पाहतोय, वाचनालयांत बरीच पुस्तके जुनी आहेत. मी नवीन पुस्तकांची मागणी वारंवार केली होती. नवीन पुस्तके मिळत नाहीत. वाचनालयाची वेळ सुद्धा कमी आहे त्यामुळे लोकांना सोयीस्कर होत नाही. तिथे योग्य माणूस असायला पाहीजे. नवीन पुस्तकांबरोबर जुनी पुस्तके सुद्धा तिथे असावीत. हे संगणक युग आहे, वाचकांची संख्या सुधारण्यासाठी, त्याप्रकारची पुस्तके देखील वाचनालयांमध्ये असली पाहीजेत. त्याबरोबर फर्नीचरची आवश्यकता आहे. ती लवकरात लवकर द्यावीत. त्यामुळे वाचकांची संख्या वाढू शकेल.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण दिले आहे,शासनाचे परिपत्रक आहे, त्याअनुषंगाने महापालिकेच्या महसूलात वाढ व्हावी. त्या अनुषंगाने लायब्ररीचे शुल्क केले होते. वास्तविक पाहता एवढे मोठे शहर व फक्त १६ वाचनालये. उत्पनाची तुलना दिली आहे एक वर्षात रु.१,३२,००,०००/- इतके खर्च होतात. साधारणतः एका वाचनालयासाठी सव्वा ८ लाख खर्च होतात.असे म्हटले तरी चुकीचे ठरत नाही. असा खर्च असेलतरी १२ महिन्यांत एका वाचनालयासाठी साधारणतः रु.६८,,७५०/- खर्च होतो. त्याचा ताळमेळ लावला तर साधारणतः आपल्या लायब्ररीयन, एक शिपाई, यांचे सहाव्या वेतनाप्रमाणे याचा हिशोब केलातर ४० ते ५० हजार पगारासाठी देतो. मग लाईटबील व अन्य बीले असतील. हा खरेतर तोट्यातील कारभार होणार आहे. यातून पैसा कमवावा, उत्पन्न वाढवावे असे मुळात ठरवू नये. सुधारणांच्या अनुषंगाने यात एक दीड कोटींऐवजी ५ कोटी खर्च करावे लागतील. हे खर्च केलेच पाहीजेत. खरेतर महापालिकेतील वाचनालयांत चांगल्या प्रकारची पुस्तके असावीत. त्यामुळे वाचकांच्या ज्ञानात भर पडेल. वास्तविक पाहता, हा विषय आयुक्त साहेबांच्या आवडीचा विषय असला पाहीजे. लोकांनी इतर खाजगी वाचनालयांमध्ये न जाता त्यांना तिथे न मिळणारी पाहीजे असलेली पुस्तके त्यांना महापालिकेच्या ग्रंथालयातच उपलब्ध असतील असा नागरीकांचा दृष्टीकोण व्हावा यासाठी खर्च करावा, असा सर्व सभागृहाचा सूर आहे. लायब्ररी अजिबात चालत नाहीत. का चालत नाहीत याचा आधी शोध घ्यावा. चांगली आध्यात्मिक, धार्मिक, स्पर्धा पुस्तके, चांगल्या प्रकारची पुस्तके असावीत. वाचनालयांतील वातावरण चांगले असावे. फर्नीचर चांगले असावे. केअरटेकर चांगले असावेत. तरीसुद्धा वाचनालय चालत नाही. तिथे वाचनाचे प्रेम नाही असे वाटत असेल तर, ज्याठिकाणी अशी आवड लोकांमध्ये आहे. मागणी आहे. आवड कधी निर्माण होईल, ज्यावेळी लोकांना नवीन पुस्तके वाचायला मिळतील. यातून महसूल वाढवायचे हेच काम आपल्याकडे राहीले आहे का. याला सभागृह बिल्कूल अनुमती देणार नाही. आधी या सर्व सुधारणा करा. त्यानंतर सुद्धा

नागरीकांकडून प्रतिसाद मिळाला नाही. यासाठी महापालिकेचे १०/५ कोटी खर्च झालेतरी चालतील. काही हरकत नाही. परंतू वाचनालये सुसज्ज झाली पाहीजेत. इथेतर महापालिकेचे रु.६०,०००/- फक्त पगारापोटी खर्च पडतो. इतका खर्च होत असेल तर त्या भागातील नगरसेवक असेल, सामाजिक संस्था असेल, रजिस्टर्ड मंडळे असेल यांना महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने त्यांच्याकडून डिपॉझिट घेऊन ही वाचनालये चालवायची जबाबदारी घेत असतील तर का देऊ नये. परंतू त्यावेळी महापालिकेच्या अटी शर्ती त्यांना बंधनकारक असतील. महापालिकेच्या नॉर्मस् प्रमाणे त्यांनी चालवावे असे नियम केले तर प्रायोगिक तत्वावर दिलेतर अशा पद्धतीने हे मंडळ, नगरसेवक असेल, त्या भागातील सामाजिक संस्था असेल तरी महापालिकेने अटी शर्तीवर सभासद फी महापालिकेकडे वाढवावी. आपल्या कोषागारात पैसे भरावेत. त्यांचा काही संबंध राहणार नाही. फक्त पुस्तकांची जबाबदारी, लायब्ररी उघडायची, बंद करायची जबाबदारी घ्यावी. तिथे केअरटेकर ठेवावा. आत्ता हा अनाठायी खर्च होतो आहे, हा खर्च केवळ पगारापोटी जातो आहे. हा बाकी खर्च नाही. तिथे चांगली पुस्तके उपलब्ध करुन द्यावीत. नागरीकांच्या ज्ञानात चांगली वाढ करावी. अशा पद्धतीने प्रयोग करायला हरकत वाटत नाही. या विषयाला माझी उपसूचना आहे - शुल्कात वाढ करणेकामी मा.महापालिका आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १६ सार्वजनिक वाचनालय शुल्कामध्ये माहे १ एप्रिल २०१४ पासून पुढीलप्रमाणे दरवाढ सूचविणेत येत आहे.

१) वाचनालय अनामत र.रु.५० सुधारीत वाढ र.रु.२०० ऐवजी १००

२) वाचनालय मासिक वर्गणी र.रु.१५ सुधारीत वाढ र.रु.३० ऐवजी २०

३) वार्षिक वर्गणी आगाऊ र.रु.१२५ सुधारीत वाढ र.रु.३०० ऐवजी २००

(वर्गणी आगाऊ न भरल्यास र.रु.३६० ऐवजी र.रु.२५०)

४) वाचनालय प्रवेश शुल्क र.रु.१० ऐवजी र.रु.१०

सध्याच्या वाचनालयांमध्ये पुस्तके जुनी/जीर्ण झालेली असून या सर्व वाचनालयांचे आधुनिकीकरण करुन वाचनालयांमध्ये नामवंत लेखकांची पुस्तके, कादंब-या, गोष्टीची पुस्तके, ऐतिहासिक, धार्मिक, स्पर्धा परीक्षांची पुस्तके ठेवावीत. तेथील वातावरणाचे पावित्र्य जपण्यात यावे. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या धर्तीवर सर्व वाचनालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी व उपरोक्तप्रमाणे शुल्कात वाढ करणेस मान्यता देणेत यावी. हे सर्व बदल केल्यानंतर अशा प्रकारची सुधारीत दरप्रणाली राबवावी.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.तानाजी खाडे –** मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांना प्रश्न विचारायचा आहे. सभा शाखेमार्फत विषय क्रमांक ५,७,८,१०,११,१२ व १५ हे मा.विधी समितीमार्फत शिफारस करण्यात आली आहे. हे कायद्याने अशी शिफारस करणे बंधनकारक आहे का? का मा.शहर सुधारणा समितीमार्फत करणे आवश्यक आहे. मा.विधी समिती मार्फत शिफारस करणे चुकीचे असेल तर हे विषय बरखास्त होणार आहेत का. हे विषय परत दुरुस्तीसाठी येणार आहेत का. पुणे महापालिकेत बीआरटी चे विषय मा.शहर सुधारणी समितीमार्फत येत असतात. हे चुकीचे नाही का याचा खुलासा करावा.

**मा.नगरसचिव** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, आत्ता सन्मा. सदस्य तानाजी खाडे यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्याबद्दल खुलासा करतो की, ५० लाख पर्यंत प्रशासकीय मंजुरीचे विषय, त्याचे अधिकार मा.विधी समितीला आहेत. ५० लाखापर्यंतच्या विषयांना मान्यता मा.विधी समिती देऊ शकते. ५० लाखापुढील विषय मा.विधी समितीमार्फत शिफारस होऊन मा.महापालिका सभेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी येतात.

**मा.तानाजी खाडे –** मा.महापौर साहेब, मी विधी समितीचा सभापती होतो व झोपडपट्टी सुधार समितीचा सुद्धा सभापती होतो. मा.झोपडपट्टी सुधार समितीचा सभापती असताना त्यावेळी विषय यायचे ते बरोबर होते. मा.शहर सुधारणा समिती स्थापन झाल्यानंतर शहरा संदर्भातील विषयांचे अधिकार मा.शहर सुधारणा समितीला होते. मागील वर्षी जेएनएनयुआरएमचे करोडो रुपयांचे विषय १के खाली मा.महापालिका सभेत दाखल करुन चुकीचे काम झाले आहे.

**मा.महापौर** – आत्ता वाचनालयाचा विषय चालला आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वाचनालयाचा विषय खरेतर मा.शहर सुधारणा समितीतून इथे यायला पाहीजे. हा विषय मागे घेण्यात यावा अशी विनंती करतो. कमीत कमी ४५ सदस्य सभागृहात आहेत. दोनही विषयांवर माझी हरकत आहे. सभा चुकीच्या पद्धतीने चालली आहे.

**मा.महापौर** – एक तृतीयांश सदस्य चालतात.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझी हरकत आहे. हे विषय माघारी घेण्यात यावेत.

**मा.श्रीरंग बारणे–** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड शहरामध्ये महापालिकेची एकूण १६ वाचनालये आहेत. परंतू आपण शहरातील वाचनालये पाहीली तर काही ठिकाणी पहिल्या, दुस-या मजल्यावर आहेत. तिथे ज्येष्ठ नागरीकांना जाता येत नाही. प्रामुख्याने वाचनालये तळ मजल्यावर शक्यतो असावीत. मा.योगेश बहल यांच्या मताशी मी देखील सहमत आहे. वाचनालये अद्ययावत असावीत. तिथे सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध असावीत. महापालिकेचे पैसे उकळणे, पैसे घेणे, खर्च होतो आहे म्हणून वाचनालयांचे शुल्कात वाढ करणे हे मात्र मला पटत नाही. राज्य शासनाचे नगरविकास विभागाचे दि.२/७/१९९८ चे परिपत्रक आहे. त्याला जवळपास १५ वर्षे लोटली आहेत. सगळ्या प्रकाराला १५ वर्षे झाली आहेत. त्यानंतर आपण या सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले आहे, १५ वर्षांपूर्वी राज्य शासनाने संबंधित महापालिकांना परिपत्रक पाठवले होते. यात वेळोवेळी प्रशासनाने याबाबत सभागृहाला सांगितले असते तर निश्चितपणे यात इतकी वाढ झाली नसती. सर्व वाचनालये करत असताना आपल्याकडे पुस्तकांची संख्या कमी आहे. म्हणून जाणारा वाचक जात नाही. आपल्या अगोदरच्या कारकीर्दीतीलच एक क्लार्क होता. तो ज्या ठिकाणी राहतो त्याच वॉर्डातील वाचनालयाची ड्युटी घेत होता. कुणाला पुस्तक हवे असेल तर त्याच्या घरी चावी आणायला जावे लागायचे. वाचनालयातील वाचकांची संख्या का रोडावली आहे यामागे तिथे काम करणारे कर्मचारी सुद्धा जबाबदार आहेत. हे ध्यानात घेतले पाहीजे. वाचनालयांत काम करत असताना पुस्तके थोडी असावीत. परंतू चांगली असावीत. अद्ययावत असावीत. वाचनालयाच्या सभोवतालच्या परिसरात देखील पहावे. तिथे वाचक आहेत का. ते वाचनालयांत जातील का हे देखील पाहीले पाहीजे. मा.आर.एस.कुमार यांनी सांगितल्याप्रमाणे सेंट्रल लायब्ररीचा सुद्धा विचार करावा. करोडो रुपये खर्च करुन क्रिडा लायब्ररी केली होती. ती अतिशय उत्तम झाली होती. आज या वाचनालयाची परिस्थिती दयनीय आहे. यात जातीने लक्ष घालावे. ही लायब्ररी कार्यरत केलीतर शहरातील खेळाडूंना त्याचा फायदा होईल.

**मा.आशा शेंडगे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर याठिकाणी वाचनालयांची फी वाढवायची असा विषय आला आहे. आपण वारंवार रस्ते कर, विविध ठिकाणचे कर सामान्य नागरीकांकडून जमा करत असतो. त्या मोबदल्यात आपण नागरीकांना तेवढ्या प्रमाणात सुविधा देतो का. नागरीक रस्त्यातील खड्यांमध्ये अनेक वेळा पडतात. अनेक रस्त्यांची कामे अर्धवट पडल्यामुळे अनेकांचे मृत्यू होतात. त्यांच्याकडून घेतलेल्या कराचा मोबदला त्यांचा जीव घेऊन आपण त्यांना देतो का. असे असताना वाचनालयाचा खर्च परवडत नाही म्हणून त्यांचे दर वाढवले पाहिजे असा विषय मंजूर करु नये. अत्यंत चुकीच्या पद्धतीने आला आहे. सेवाभावी वृत्तीने, वाचनाची आवड वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहीजे. लोकांकडून जास्त पैसे

घेऊन आपल्या उत्पन्नात वाढ होणार नाही. एलबीटीतून उत्पन्न कमी झाले म्हणून या माध्यमातून उत्पन्न वाढवायचा प्रयत्न करतोय का काय असा प्रश्न निर्माण होतो आहे. कासारवाडी इथे जे इतिहास संशोधन केंद्र व संदर्भ ग्रंथालय उभारले आहे. त्यात ऑगस्ट २०१० पासून आजपर्यंत अवघे २० ते २५ लोकांनी त्याचा वापर केल्याचे म्हटले जाते. लोकांच्या आणून सह्या घेतल्या. तिथून हायवे जातो आहे. अशा मोठी जागा आहे, याठिकाणी स्पर्धा केंद्र उभे करु शकतो. त्याचबरोबर लहान मुलांचे दर्जेदार वाचनालय निर्माण करणे अशक्य नाही. लहानपणापासून मुलांमध्ये वाचनाची आवड रुजविली पाहीजे. लहान मुलांसाठी वाचनालय करावे. दर्जेदार स्पर्धा परीक्षा केंद्र, दर्जेदार वाचनालय, अभ्यासिका उभारावी म्हणून मी जनसंपर्क विभागाकडे पत्र दिले होते. आपले आयुक्त साहेब निगडी येथील शाळेत शिकले. ते आयएएस ऑफीसर म्हणून आपल्याकडे आलेत ही आपल्या शहरासाठी कौतकास्पद बाब वाटते. ते आपल्या शहरातीलच आहेत. मग आयुक्त साहेब, आपण विद्यार्थी घडवावेत म्हणून अशा प्रकारची वाचनालये, स्पर्धा परीक्षा केंद्रे आपल्याकडे अद्ययावत स्थितीत असावीत. नागरीकांवर कोणत्याही प्रकारचा भार टाकण्याइतके वाईट दिवस पालिकेवर आलेले नाहीत असे वाटते.

**मा.सुजाता पाडाळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३८३ विषय क्रमांक - ५

दिनांक - २०/११/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सावा/४/कावि/४७/२०१३ , दि.०३/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्रमांक १०९ नुसार

३) मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/१०/२०१३ ठराव क्र.४४९१ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १६ सार्वजनिक वाचनालय चालविणेसाठी सध्या होणारा एकूण खर्च र.रु.१,३१,२१,७२२/-येत असून १६ सार्वजनिक वाचनालयाचे वार्षिक उत्पन्न मार्च २०१४ अखेर अंदाजे र.रु.३,२६,१२२/-तसेच KRA मध्ये सुचविलेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये नविन गावे समाविष्ट झाल्याने नव्याने सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यात येत आहे .पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १६ सार्वजनिक वाचनालयाच्या वार्षिक खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे .तसेच

पुस्तकाच्या किंमतीमध्येही वाढ होत आहे . महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग परिपत्रक जी.ई.एन.१०९८/२५८/प्र.क्र.७०/९८ नवि-२४ दिनांक २/७/१९९८ अन्वये महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबत कळविले आहे .महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २९ मधील ४५८ (४२) या तरतूदीस अधिन राहून व राष्ट्रीय मुल्यवृध्दीच्या अल्प बचत योजनांनुसार विचार करता सार्वजनिक वाचनालयांचे शुल्क त्या प्रमाणात खालील प्रमाणे वाढविणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या शुल्क वाढीमुळे साधारणत: (एका वाचनालय) महसूल र.रु.७६,५००/-अपेक्षित असून १६ वाचनालयांचे सभासदांपासून महापालिकेस अंदाजे र.रु.१२,२४,०००/- इतका महसूल मिळेल . सबब सार्वजनिक वाचनालय शुल्कात माहे १ एप्रिल २०१४ पासून पुढील प्रमाणे दरवाढ सुचविणेत येत आहे.

१) वाचनालय अनामत र.रु.५०/-ऐवजी र.रु.२००/-
२) वाचनालय मासिक वर्गणी र.रु.१५/- ऐवजी र.रु.३० /-
३) वार्षिक वर्गणी आगाऊ र.रु.१२५/- ऐवजी र.रु. ३००/-
(वर्गणी आगाऊ न भरल्यास र.रु.३६०/-)
४) वाचनालय प्रवेश शुल्क र.रु.१०/-ऐवजी र.रु.१०/-

उपरोक्त प्रमाणे शुल्कात वाढ करणेकामी मा.महापालिका आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला १६ सार्वजनिक वाचनालय शुल्कामध्ये माहे १ एप्रिल २०१४ पासून पुढीलप्रमाणे दरवाढ सूचविणेत येत आहे.

१) वाचनालय अनामत र.रु.५० सुधारीत वाढ र.रु.२०० ऐवजी १००
२) वाचनालय मासिक वर्गणी र.रु.१५ सुधारीत वाढ र.रु.३० ऐवजी २०
३) वार्षिक वर्गणी आगाऊ र.रु.१२५ सुधारीत वाढ र.रु.३०० ऐवजी २००
(वर्गणी आगाऊ न भरल्यास र.रु.३६० ऐवजी र.रु.२५०)
४) वाचनालय प्रवेश शुल्क र.रु.१० ऐवजी र.रु.१०

तसेच सध्याच्या वाचनालयांमध्ये पुस्तके जुनी/जीर्ण झालेली असून या सर्व वाचनालयांचे आधुनिकीकरण करुन वाचनालयांमध्ये नामवंत लेखकांची पुस्तके, कादंब-या, गोष्टीची पुस्तके, ऐतिहासिक, धार्मिक, स्पर्धा परीक्षांची पुस्तके ठेवावीत. तेथील वातावरणाचे पावित्र्य जपण्यात यावे. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या धर्तीवर सर्व वाचनालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी व उपरोक्तप्रमाणे शुल्कात वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.सदगुरु कदम, मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव..

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/१०/२०१३ ठराव क्र.**4565** नुसार

सन २००७ पासून पीएमटी व पीसीएमटीचे विलिनीकरण होवून पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. स्थापन झालेली आहे. महामंडळाचे स्थापनेपासून मागील वर्षापर्यंत पूर्व पीसीएमटी कर्मचा-यांना पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाने पिंपरी चिंचवड महापालिकेबरोबर केलेल्या करारनाम्यानुसार सानुग्रह अनुदान व बक्षिस अदा करण्यात येत होते.

सन २०१२-१३ मध्ये पूर्व पीसीएमटी कर्मचारी संख्या १५८६ असून सदर कर्मचा-यांना ८.३३ सानुग्रह अनुदानापोटी र.रु.३,१६,३९,८७४/- व बक्षिस र.रु.११,०००/- प्रमाणे रक्कम रुपये १,७४,४६,०००/- असे एकुण ४,९०,८५,८७४/- इतकी रक्कम लागणार आहे.

सबब पूर्व पीसीएमटी कर्मचा-यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे सन २०१२-१३करीता सानुग्रह अनुदान व बक्षिसापोटी एकुण र.रु.४,९०,८५,८७४/- पीएमपीएमएलला मा.महापालिका सभेच्या उमेदमान्यतेवर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण म्हटले आहे. हा सदस्य प्रस्ताव आहे. प्रशासनाने आपले मत सभेपुढे सांगावे.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) –** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, २००७ मध्ये पीएमटी व पीसीएमटीचे विलिनीकरण झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात पीएमपीएल यांना मदत करण्यासाठी शासनाने आदेश निर्गमित केला होता. पुणे व पिंपरी चिंचवड या दोन्ही महापालिकांना २०१० पर्यंत निधी द्यावयाचा होता. नंतर शासन निर्णय निर्गमित झाला, २०१३ पर्यंत काही प्रमाणांत त्यांना निधी देण्यात यावा. तो निधी देखील आपण त्यांना दिला आहे. त्यामुळे आज रोजी पीएमपीएमएल यांना शासनाच्या निर्देशानुसार देय निधी देऊन झाला आहे.

गेले २ वर्षांत सानुग्रह अनुदान, बोनस रक्कमेबाबत आपण व पुणे महापालिका या दोघांनी पीएमपीएमएल यांना कळवले आहे, शासन निर्णयानुसार देय रक्कम देय होती. त्यातून बोनस देण्यास मंजूरी दिली. त्याप्रमाणे २ वर्षे सानुग्रह अनुदान व बोनस रक्कम पीएमपीएमएल यांनी दिली आहे. याकरिता पुन्हा सानुग्रह अनुदान व बोनस रक्कम वेगळे देणे लागत नाही. देय रक्कम दिलेली आहे. ऑक्टोबर मध्ये पीएमपीएलच्या सभेमध्ये मा.महापौर, मा.स्थायी समिती अध्यक्ष सुद्धा होते. सभेमध्ये यावर सविस्तर चर्चा झाली आहे. त्याचे प्रोसिडींगमध्ये आहे, पीएमपीएमएल यांनी आर्थिक परिस्थिती बघून बोनस द्यायचा का नाही याबाबत निर्णय घ्यावा. मला वाटते, आपण आपली जबाबदारी पूर्ण केली आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आयुक्त साहेबांनी सांगताना सांगितले मा.महापौर साहेब, स्थायी समिती अध्यक्ष हे सभेला होते. स्वतः आयुक्त आपणदेखील तिथे असता. आमची आपल्याला विनंती आहे, तुम्ही ३ जणांनी मिळून जबाबदारी स्विकारावी. त्यांचे समाधान होईल अशा प्रकारे काम करावे. हा विषय दप्तरी दाखल करण्यात यावा.

**मा.राजु मिसाळ** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, सूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर –** विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ३८४ विषय क्रमांक – ६
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.सदगुरु कदम, मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव..
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २९/१०/२०१३ ठराव क्र.**4565** नुसार

विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

## मा.विधी समितीचे ठराव

**मा.वैशाली काळभोर** - महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३८५ विषय क्रमांक – ७

दिनांक - २०/११/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/बीआरटीएस/६०३/२०१३, दि.२६/०८/२०१३

२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.९८ नुसार

मनपाचे बीआरटीएस विभागाकडील विषयपत्रानुसार औंधरावेत रस्त्यावरील मुकाई चौक येथे बस टर्मिनल विकसित करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१,३०,३५,०००/- इतकी आहे. सदर काम पूर्ण करणेस एकूण १२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सदरचे कामास सन २०१३-१४ मध्ये एकूण २,९०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे.(पानांक ४८ अ.क्र.१४/१३७) सदर बस टर्मिनलचे क्षेत्रफळ ९२० चौ.मी. असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. १) बांधकामाचा प्रकार-वीट बांधकाम २) छताचा प्रकार- GI Sheet ३) Flooring - Anti Skid flooring ४) भिंतीस Aluminum Cladding ५) Control Room ६) Ticket Counter ७) Separate Platform for BRT & Private buses ८) Rest Room for bus Driver ९) Waiting area for passengers १०) Parking for private vehicles ११) Toilet block याकामी येणा-या र.रु.१,३०,३५,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी तीस लाख पस्तीस हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.अजित गव्हाणे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, औंध-रावेत रस्ता बस टर्मीनल्स संदर्भात प्रशासकीय मान्यतेसाठी विषय सभागृहापुढे आला आहे. बीआरटीएसचे १२ रस्ते आहेत. बस टर्मिनल्स प्रत्येक रस्त्यावर करणार आहात का. करणार असाल तर किती सेंटर वर करणार आहात. फक्त औंध-रावेत याचा विषय का आला. बाकी बस टर्मीनल्स याचा विषय का आला नाही. आत्ता करायचा नसेल तर कधी करणार आहात. एकूण परिस्थिती पाहीलीतर विकासाचा समतोल साधला गेला नाही. काही भागांत विशेषतः ग्रामिण भागात विकासाचा समतोल राखला गेला पाहीजे. एक शहर म्हणून शहर पातळीवर काम करताना ज्या १०/१२ रस्त्यांचा अंतर्भाव यात आला पाहिजे. माझी या निमित्ताने आपल्याला विनंती आहे की, आपण

किंवा संबंधित लोकांनी याचा खुलासा करावा. नेमके काय करणार आहोत. भविष्यात काय-काय उपाय योजना आहेत. बाकी बीआरटीएस रस्ते कधी करणार आहोत याची माहिती द्यावी.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) –** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, आत्ता बीआरटीचे ४ रस्ते मंजूर आहेत. पुणे-मुंबई, औंध-रावेत, नाशिक फाटा-वाकड, काळेवाडी-देहू आळंदी रस्ता त्याची ४५ मी लांबी आहे. औंध-रावेत हा किवळे-सांगवी असाच हा रस्ता आहे. यापैकी पुणे-मुंबई रस्त्यावर सीएमईची हद्द संपते तिथे बस टर्मीनल्स उभारायला जागा उपलब्ध नाही. पीएमपीएमएल बरोबर झालेल्या चर्चेप्रमाणे खडकी बाजार इथे बसस्टॅण्ड आहे तिथे बसेस फिरवल्या जातील. निगडी इथे जकात नाक्याची जागा आहे. रेड झोनमध्ये येत असल्यामुळे तिथे बांधू शकत नाही. गाड्या ओपनमध्ये पार्क होतील. रेड झोनचा निर्णय नंतर बांधकाम करणार आहोत. औंध-रावेत किंवा किवळे-सांगवी या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बस टर्मीनस करायला घेतोय. किवळे व सांगवी इथे सुद्धा बस स्टेशनचा समावेश करतोय. त्याचा प्रस्ताव चालू आहे. नाशिक फाटा-वाकड यात भोसरी इथे सध्या पूलाखाली सुरु करणार आहोत. नंतर मोठ्या प्रमाणात बस टर्मीनस बांधण्यासाठी जागेची अडचण आहे. पीएमपीएल व आपण प्रयत्न करत आहेत. वाकड इथे सुद्धा जागेबाबत प्रयत्न करत आहेत. काळेवाडी, देहू-आळंदी रस्ता इथे जागा मालकांनी जागा देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. देहू-आळंदी रस्ता बीआरटी होणार आहे. हा थोडा विकसित भाग नाही. त्याठिकाणी बस टर्मीनल्स विकसित देखील केला जाईल. बीआरटी ४/५ महिन्यांत सुरु करतोय. त्याप्रमाणे टर्मीनसचे काम हाती घेतोय.

**मा.विलास नांदगुडे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाच्या निमित्ताने आपले लक्ष वेधू इच्छितो की, विषयाला विरोध नाही. परंतू वारंवार प्रत्येक वेळी सांगितले होते, पिंपरी निगडी इथे बस टर्मीनससाठी जागा ठेवण्यासाठी अडीच हेक्टर जागा ताब्यात घेतली आहे. काही ठिकाणी कंपाऊंड केले आहे. काही ठिकाणी मोकळी जागा पडलेली आहे. तिथे झोपडपट्टी व वेगवेगळी मंदीरे झाली आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेने टेंडर सुद्धा का काढले आहे. आत्ता सांगितले, पीएमपीएलचा बस टर्मीनल्स आपण करणार आहोत. कारण पीएमपीएलकडे फंडस् नाहीत. या परिस्थितीत बस टर्मीनस करायचे राहीले आहेत. बीआरटी रोडवर बस टर्मीनल्स करायचे असतील तर पिंपळे निलख याचा आपण विचार करणार आहात का? सांगवीला धरता, रावेतला धरता, पिंपळे निलखला मात्र विसरून जाता आहात. नाहीतर तिथे झोपडपट्टी होईल. याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,यासंदर्भात एक आठवण करुन द्यायची आहे. अशी सुविधा शहरात करणे गरजेचे आहे. परवा आयुक्त साहेबांची बातमी

वर्तमानपत्रामध्ये वाचनात आली होती, बीआरटीएस रोडवरील सुविधा कशा असणार आहेत? समाधान वाटले आपला बीआरटीएस रोड नक्कीच चांगला असणार आहे. भविष्यात बीआरटीएसवरुन पुणे महापालिका व आपल्यात वादावादी होऊ नये अशा प्रकारे बीआरटीएस कॉरीडॉरमध्ये बस टर्मीनल्स उभे करताना जिथे जिथे आवश्यक आहेत, तिथे करावेत. सांगवीत बस टर्मीनल्स करायला सुरुवात होते आहे. आपल्याकडे या विभागाचा काही दिवस चार्ज होता म्हणून विनंती आहे, तुम्ही तिथे सभासद म्हणून जात असताना आपण सर्वात पहिला बस टर्मीनल्स पीएमपीएल यांच्या पॉलिसीप्रमाणे बीओटी तत्वावर विकसित करण्यात यावा. जवळपास अडीच तीन एकरचा परिसर आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील पहिला मोठा टर्मीनल्स उभा करावा. जिथे-जिथे आवश्यकता आहे, तिथे तिथे रस्त्यावर टर्मीनल्स उभे करण्यात यावेत. सुरुवातीची ठिकाणे आहेत, तिथे बीओटी तत्वावर करण्यात यावा अशी विनंती करतो. हा विषय मंजूर करण्यात यावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३८६ विषय क्रमांक – ८

दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पअक/२/कावि/७५२/२०१३, दि.१७/०९/२०१३

२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.१०२ नुसार

मनपाचे सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील पान क्र.७७१ अ.क्र.२१ मधील मोशी कचरा डेपो येथे जुन्या कच-यावर व एस.एल.एफ.क्लोजर करता यापुर्वी केलेल्या कॅपिंगवर सोलर फार्मिंग करुन विद्युत निर्मिती करणे या कामाचे ( अंदाजपत्रकीय र.रु.१०.०० कोटी व तरतुद र.रु.५.०० लाख) ऐवजी मोशी कचरा डेपो येथे सॅनिटरी लॅन्डफिल साईट टप्पा २ विकसित करणेचे काम करणेस मान्यता असलेस अंदाजपत्रकीय किंमत र.रु.१२.५० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात शहराचा प्रमुख कचरा डेपो येतो म्हणून आवर्जून बोलायची इच्छा प्रदर्शित केली आहे. हा अत्यंत चिंतनाचा विषय आहे. आत्ता सभागृहात संख्या रोडावली आहे. या प्रश्नावर चर्चा करायला कोणामध्ये रोष राहीलेला नाही. परंतू शहराच्या दृष्टीकोणातून कच-याचे नियोजन व त्या संदर्भातील प्रश्न उपस्थित झाला आहे. सोलर फॉर्मिंग ऐवजी मोशी कचरा डेपो येथे सॅनिटरी लॅन्डफिल साईट टप्पा २ विकसित करण्याचा विषय आहे. मोशी कचरा डेपो यात काय काय चालते. सन्मा. नगरसेविका मा.सुलभाताई ऊबाळे व मा.सिमा सावळे यांचे जवळचे नाते या कचरा डेपोशी आहे. तिथे काय काय चालते. फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार तिथे चालतो. सर्वांना शहरामध्ये चांगले प्रोजेक्ट हवे असतात. झू पार्क असेल, मत्स्यालय असेल, म्युझियम असेल यासारखे प्रोजेक्ट माझ्या वॉर्डात कसे करता येतील यासाठी युद्ध चालू असते. माझ्या प्रभागात कचरा डेपो हवा असे कोणताही नेता शहरात आजपर्यंत बोलला नाही. महापालिकेच्या निर्मीतीपूर्वी मोशी इथे हा कचरा डेपो सुरु आहे. लोकांनी कित्येक दिवस अत्यंत दूर्गंधीचा त्रास सहन केला. त्याठिकाणी लोकांनी जन आंदोलन केले. त्यामुळे वासाची दुर्गंधी कमी झाली आहे. कचरा डेपोची परिस्थिती पाहिलीवर एकूण ८१ एकरमध्ये विस्तारीत आहे. हा प्रोजेक्ट पाहीलातर आत्तापर्यंत कच-याचे कॅपींग १५ एकर जागेमध्ये केले आहे. मेकॅनिकल कंपाऊंडींग प्रोजेक्ट १० एकरमध्ये अर्धवट अवस्थेत आहे. लॅण्ड फिलींग करायचा प्रोजेक्ट करतोय. लॅण्ड फिलींग करायचा विषय आज आला. यापूर्वी १४ एकर जमिन होती. त्या जमिनीचे नुकसान झाले आहे. ती पुन्हा वापरता येणार नाही. इंधन निर्मिती प्रोजेक्ट यासाठी ५ एकर, गांडूळखत यासाठी ५ एकर जागा आहे. जवळजवळ निम्मी जागा अस्तित्वात राहीलेली नाही. जो रामकेचा प्रोजेक्ट चालू आहे, त्याची क्षमता ५०० टनाची असताना केवळ ३०० टन कच-याचे कॅपींग केले जाते. २०० टन डंपींग केला जातो. निम्मी जागा गेली आहे. निम्म्या जागेवर अशा प्रकारे कचरा ठेवलातर पुढील २ वर्षांत कचरा डेपोत जागा शिल्लक राहणार नाही. कोणताही स्थायी प्रोजेक्ट तिथे राबवा. कुलकर्णी साहेबांनी सांगितले, प्रायोगिक तत्वावर त्याठिकाणी चालू आहे. प्रोजेक्ट २०० एकरचा आहे. यात कोणत्याही प्रकारची जागा एकदम कमी लागते. स्थायी प्रोजेक्ट आपण आणा. आपण कच-याचे प्रती डोंगर करतोय. यातून पाण्याचे प्रदूषण होत नाही. भविष्यात हे डोंगर आरोग्याला घातक ठरणार आहे. यातून प्लास्टीक वेगळे केलेले नाहीत. याचा कायदा आहे, कायद्याला हरताळ फासलेला आहे. सर्वांना माहित आहे. जो काही घनकचरा व्यवस्थापन कायद्यानुसार सगळ्या प्रभागांत कचरा स्थानांतरण केंद्रे स्थापन केलेली नाहीत. ओला, सुका असा कचरा वेगळा करतो. त्याची अंमलबजावणी सुरु आहे असे आजपर्यंत झालेले नाही. सगळा कचरा डेपोत टाकतो. त्यामुळे प्लास्टीकचे विघटन अजिबात

होत नाही. पर्यायाने भविष्यात जे प्लास्टीक गाडले गेलेले आहे, फार मोठ्या प्रमाणात परिसरात रोग पसरण्याची शक्यता आहे. औद्योगिक कचरा सुद्धा यात लॅण्ड फिलिंगमध्ये सॉर्टिंग केलेला नाही. विषारी वायु तिथे निर्माण झालेला आहे. स्थायी प्रकल्प उभे करा. त्याठिकाणी करण्यात येणारे कच-याचे लॅण्ड फिलींग ताबडतोब थांबवावे. घरातूनच कच-याचे नियोजन झाले पाहीजे. म्हणून शासनाचा कचरा नियोजन कायदा आहे तो सुद्धा राबवावा. तो आजतागायत महापालिकेत राबविलेला नाही. जनवाणी संस्थेच्या माध्यमातून पुणे महापालिकेत कच-यातून विद्युत निर्मिती प्रकल्प केला आहे. त्यांच्याशी करार करा. याठिकाणी हा प्रकल्प सुरु करा. कचरा डेपोची जागा फार कमी आहे. त्याठिकाणी २००९ मध्ये तिथे ५०० मी. बफर झोन प्रस्तावित केला आहे. तिथे आमच्या नागरीकांना सुविधा मिळत नाहीत. हा त्यांच्यावर फार मोठा अन्याय आहे. २००९-२०१० पासून यावर चर्चा झाली आहे. हा निर्णय शासन दरबारी प्रलंबित आहे. निर्णय प्रस्तावित केला आहे म्हणून त्याठिकाणी नागरिकांना सुविधा देण्यात याव्यात. आमचे नागरीकही महापालिकेचा कर भरतात. पुढील महापालिका सभेमध्ये मी जे जे मुद्दे मांडले आहेत, त्याचे नेमके काय केले याचे निराकरण करावे. त्याचा अहवाल तयार करावा अशी विनंती करतो. शाळेच्या कंपाऊंडचे काम सुरु होते. त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली होती. परंतू संबंधित ठेकेदार श्री.मातेरे यांचा विषय मा.स्थायी समितीच्या ऑगस्टमधील सभेमध्ये मंजूर झाला आहे. एवढे महिने होऊन सुद्धा त्यांनी अजून काम सुरु केलेले नाही. प्रशासनाकडून त्याला नोटीस बजावण्यात आली आहे. माझी मागणी आहे, अशा पद्धतीने हयगय करणारा ठेकेदार असेल तर त्याला ब्लॅकलिस्ट का केले नाही. आत्तापर्यंत त्यांना ३ पत्रे दिलेली आहेत. माझी मागणी आहे, मा.आयुक्त साहेबांनी श्री.मातेरे याच्यावर ताबडतोब कारवाई करावी व त्यांना ब्लॅकलिस्ट करावे. त्याने पूर्ण नियमांचे उल्लंघन केले आहे. या सर्व गोष्टींची आपण दखल घ्यावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नंदाताई ताकवणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३८७ विषय क्रमांक – ९

दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. पापु/बप्र/१५/३९३/२०१३,दि.२१/०९/२०१३

२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.१०४ नुसार

रावेत येथील अशुध्द जलउपसा केंद्राच्या परिसरात विद्युत विभागाकरिता स्विचींग स्टेशन बांधणेकामी येणा-या र.रु.५८,८०,७८६/- (अक्षरी र.रु.अठ्ठावन्न लाख ऐंशी हजार सातशे शहाऐंशी फक्त) चे पुर्वनणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नंदाताई ताकवणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १०

दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/बीआरटीएस/६६३/२०१३, दि.२६/०९/२०१३

२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.१०८ नुसार

सांगवी ते किवळे बीआरटीएस रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते डांगे चौक दरम्यान लक्ष्मणनगर येथे सबवे बांधणेचे कामास व याकामी येणा-या र.रु.३,८८,५५,५८६/- (अक्षरी र.रु.तीन कोटी अठ्ठयाऐंशी लाख पंचावन्न हजार पाचशे शहाऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.विनय गायकवाड** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

सांगवी किवळे रस्त्यावर कावेरीनगरकडे जाणा-या रस्त्यालगत बेलठिकानगर १६ नं. बसस्टॉप येथील २४ मीटर रुंद डी.पी. रस्त्याजवळ सबवे बांधण्यास येणा-या रक्कम रु.३,८८,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन कोटी अठ्ठयाऐंशी लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.नंदाताई ताकवणे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३८८ विषय क्रमांक - १०
दिनांक - २०/११/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/बीआरटीएस/६६३/२०१३, दि.२६/०९/२०१३
२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.१०८ नुसार

सांगवी ते किवळे बीआरटीएस रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते डांगे चौक दरम्यान लक्ष्मणनगर येथे सबवे बांधणेचे कामास व याकामी येणा-या र.रु.३,८८,५५,५८६/- (अक्षरी र.रु.तीन कोटी अठ्ठयाऐंशी लाख पंचावन्न हजार पाचशे शहाऐंशी फक्त) चे खर्चास तसेच सांगवी किवळे रस्त्यावर कावेरीनगरकडे जाणा-या रस्त्यालगत बेलठिकानगर १६ नं. बसस्टॉप येथील २४ मीटर रुंद डी.पी. रस्त्याजवळ सबवे बांधणेकामी येणा-या रक्कम रु.३,८८,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन कोटी अठ्ठयाऐंशी लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.साधना जाधव** - महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३८९ विषय क्रमांक – ११
दिनांक - २०/११/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पापु/१५/कावि/४२६/२०१३, दि.०७/१०/२०१३
२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.११० नुसार

जलक्षेत्र क्र.ड/१२ पिंपळे गुरव परिसरातील गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणी पुरवठा बंद करणे कामी स.नं.७२ येथे २० द.ल.लि.क्षमतेची टाकी बांधणे या कामास सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात र.रु.१,३०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्याने सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षासाठी या कामास र.रु.१,३०,००,०००/- चे रकमेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –
अनुकूल -९१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३९० विषय क्रमांक – १२
दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त
संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.पापु/१५/कावि/४२७/२०१३, दि.०७/१०/२०१३
२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.१११ नुसार

जुनी सांगवी येथे ६ लक्ष लिटर क्षमतेची टाकी पंप हाऊस व संप पाडून १५ लक्ष लिटर क्षमतेची नवीन टाकी बांधणे या कामास सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात र.रु.१,१५,९५,६३३/-

चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्याने सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षासाठी या कामास र.रु.१,१५,९५,६३३/- चे रकमेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १३

दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/२/कावि/२२/२०१३, दि.१४/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.११३ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नगरसचिव अभिनामाचे एक पद पे बॅन्ड र.रु. १५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. सदरचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकरीता दिनांक ३०/०७/२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येऊन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जामधून पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्याकरीता दिनांक २६/०९/२०१३ रोजी कर्मचारी निवड समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या निवड समितीने पात्र उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेऊन उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव व मुलाखतीमध्ये दाखविलेल्या प्राविण्या नुसार श्री. उल्हास बबनराव जगताप यांना सरळसेवा प्रवेशाने नगरसचिव पदावर र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधिन कालावधीकरीता मा.विधी / मा.महापालिका सभेच्या मान्यतेने नेमणूक देणेकामी शिफारस केली आहे. श्री.उल्हास बबनराव जगताप यांना नगरसचिव पदावर सरळसेवा प्रवेशाने र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणी मध्ये प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता नेमणूक देण्यास मान्यता मिळणेबाबत तसेच प्रस्तावात नमुद प्रपत्र अ प्रमाणे नगरसचिव पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.विनय गायकवाड** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

मा.स्थायी समिती ठराव क्र. १०९७५ दि.२९/५/२००१ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी. समाजसेवक पदावरुन “सहाय्यक समाज विकास अधिकारी”, सहाय्यक समाज विकास अधिकारी पदावरुन ‘समाज विकास अधिकारी’ असा पदोन्नती सोपान असल्याने सहाय्यक समाज विकास अधिकारी या पदावर ३ वर्षे काम करणा-या कर्मचा-यास समाज विकास अधिकारी वर्ग – २ या पदावर पदोन्नती देऊन अशी अर्हता ठरविणेस व सदर पद १००% पदोन्नतीने भरणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच समाज विकास अधिकारी हे वर्ग-२ चे पद रिक्त झाल्यानंतर नागरवस्ती विकास योजना विभागाकडील कामकाजाचे स्वरुप विचारात घेता समाज विकास अधिकारी हे वर्ग – २ चे पद तातडीने भरणे आवश्यक असल्याने सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता लगेच अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -३९१ | विषय क्रमांक – १३ |
| दिनांक - २०/११/२०१३ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/२/कावि/२२/२०१३, दि.१४/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.११३ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नगरसचिव अभिनामाचे एक पद पे बॅन्ड र.रु. १५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. सदरचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकरीता दिनांक ३०/०७/२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येऊन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जामधून पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्याकरीता दिनांक २६/०९/२०१३ रोजी कर्मचारी निवड समिती सभा

आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या निवड समितीने पात्र उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेऊन उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव व मुलाखतीमध्ये दाखविलेल्या प्राविण्या नुसार श्री. उल्हास बबनराव जगताप यांना सरळसेवा प्रवेशाने नगरसचिव पदावर र.रु.१५६००–३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधिन कालावधीकरीता मा.विधी / मा.महापालिका सभेच्या मान्यतेने नेमणूक देणेकामी शिफारस केली आहे. श्री.उल्हास बबनराव जगताप यांना नगरसचिव पदावर सरळसेवा प्रवेशाने र.रु.१५६००– ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणी मध्ये प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता नेमणूक देण्यास मान्यता मिळणेबाबत तसेच प्रस्तावात नमुद प्रपत्र अ प्रमाणे नगरसचिव पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. १०९७५ दि.२९/५/२००१ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी. समाजसेवक पदावरुन “सहाय्यक समाज विकास अधिकारी”, सहाय्यक समाज विकास अधिकारी पदावरुन ‘समाज विकास अधिकारी’ असा पदोन्नती सोपान असल्याने सहाय्यक समाज विकास अधिकारी या पदावर ३ वर्षे काम करणा-या कर्मचा-यास समाज विकास अधिकारी वर्ग – २ या पदावर पदोन्नती देऊन अशी अर्हता ठरविणेस व सदर पद १००% पदोन्नतीने भरणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच समाज विकास अधिकारी हे वर्ग-२ हे पद रिक्त झाल्यानंतर नागरवस्ती विकास योजना विभागाकडील कामकाजाचे स्वरुप विचारात घेता समाज विकास अधिकारी हे वर्ग – २ चे पद तातडीने भरणे आवश्यक असल्याने सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता लगेच अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३९२ विषय क्रमांक – १४

दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. प्रशा/२/कावि/२१/२०१३, दि.१०/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.११४ नुसार

डॉ.यशवंतराव माने, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३९३ विषय क्रमांक – १५

दिनांक - २०/११/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. पापु/१५/कावि/४३३/२०१३, दि.१४/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा दिनांक १८/१०/२०१३ ठराव क्र.११६ नुसार

मा.आमदार श्री.लक्ष्मण जगताप, चिंचवड विधानसभा मतदार संघ यांनी त्यांच्याकडील दि.०८/०५/२०१३ रोजीच्या पत्रान्वये मा.उपसंचालक, आरोग्य परिमंडल, पुणे यांना उरो रुग्णालय, औंध त्यांच्या जागेमध्ये असलेली सध्याची पाण्याची टाकी व संप कमी क्षमतेची व अत्यंत जुनी झाली असलेने त्याच परिसरात पाण्याची नवीन उंच टाकी व जमिनीखालील टाकी बांधणे या प्रयोजनाकरिता आरोग्य परिमंडल, पुणे या स्तरावर मान्यता मिळणेबाबत मागणी केली होती व सदर पाण्याच्या उंच टाकीची क्षमता वाढवून रुग्णालय परिसर व रुग्णालयाजवळील म.न.पा.च्या नवी सांगवी वॉर्ड क्र.५८ या परिसरातील देखील पाण्याची कमतरता भरुन निघेल या उद्देशाने मागणी केली होती. त्या अनुषंगाने जिल्हा शल्याचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पुणे-२७ यांनी मा.उपसंचालक, आरोग्यसेवा, पुणे परिमंडल यांना उद्देशून “ रुग्णालयाच्या सध्या असलेल्या टाकी शेजारील (पश्चिम बाजूस) जागेत नवीन टाकी दोन्ही रुग्णालयांसाठी बांधणेस काही हरकत नाही. त्याबाबत संबंधितांचा अहवाल घेऊन पाण्याची नवीन टाकी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे बांधकाम करण्यास या कार्यालयाची हरकत नाही या आशयाचे पत्र दि.१०/०६/२०१३ रोजी दिले आहे. “सदर उरो रुग्णालय परिसरातील सदनिका या ठिकाणचा पाणीपुरवठा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असून

त्यांचेमार्फत रितसर पाणीपट्टी वसुल करण्यात येत आहे. याशिवाय त्या परिसरातील मिळकतींचा मिळकतकर देखील म.न.पा.मार्फत वसुल करण्यात येत आहे. याशिवाय या रुग्णालयाच्या जवळच्या परिसरात म.न.पा.च्या प्रभाग क्र.५८ मधील (CME कॉलनी, गणेशनगर, समतानगर, स्वामी विवेकानंदनगर) अंदाजे ५०,००० लोकसंख्या असलेल्या भागाला पाणीपुरवठा करता येणे शक्य आहे. सद्यस्थितीत हा भाग सध्याचे पी.डब्लू.डी. जुनी टाकीच्या दृष्टीने उंचावर असल्याने पाण्याच्या तक्रारींना सामोरे जावे लागत आहे. मा.आमदार यांनी मागणी केलेप्रमाणे उरो रुग्णालयाच्या परिसरामध्ये टाकी बांधणे हे मनपाच्या सुध्दा हिताचे आहे. परंतु सदरचे बांधकाम हे त्यांच्या हद्दीत करावयाचे असलेने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

## समित्यांचे अहवाल

## मा.विधी समिती

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -३९४ विषय क्रमांक - १६

दिनांक - २०/११/२०१३ विभाग- मा.आयुक्त

अ) दिनांक २०/९/२०१३ व २७/९/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -३९५ विषय क्रमांक - १७
दिनांक - २०/११/२०१३ विभाग- मा.नगरसचिव

अ) दिनांक २५/९/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक ९/१०/१३ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल -९१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** –सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/१८/१४
दिनांक – ०६/०१/२०१४

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.